नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २५१ * * अमरावती * शुक्रवार, दिनांक ०७ मार्च २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




अग्रलेख

## खरीखरी..

## भैय्याजी आणि मराठी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे बडे नेते भैय्याजी जोशी यांनी मुंबई शहराबाबत काल जे विधान केले त्या विधानावरून मुंबईसह महाराष्ट्रात खळबळ माजणे स्वाभाविक आहे. मुंबई हे महाराष्ट्राचे नाक आहे. या मुंबईची भाषा कोणतीही एक नाही. असे म्हणणे म्हणजे मुंबई महाराष्ट्रात नाही, असे म्हणण्यासारखे आहे. भैय्याजी जोशी संघात अत्यंत आदरणीय व्यक्ती म्हणून ओळखले जातात. अशा वजनदार व्यक्तीने अति संवेदनशील आणि नाजूक विषयावर जे विधान केले. त्यावरून सर्वच पक्षांनी त्यांचा विरोध करणे क्रमप्राप्त आहे. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होईल. असे विधान केल्यावर तात्कालीन शिवसेनेला महानगरपालिकेच्या निवडणुकीत त्याचा फायदा झाला होता. तेव्हापासून एक अपवाद वगळता मुंबई महापालिकेवर शिवसेनेचा झेंडा सतत फडकला आहे. आता शिवसेनेचे विभाजन झालेले आहे. निवडणूक आयोगापुरते म्हटले तर एकनाथ शिंदेची शिवसेना ही खरी शिवसेना आहे. लोकसभेच्या निवडणुकीत ती शिवसेना आणि ही शिवसेना जवळजवळ तुल्यबळ होते. पण आता उबाठा शिवसेनेपेक्षा तिप्पटच्यावर जागा जिंकून एकनाथ शिंदे यांनी सत्ता किती प्रभावी कार्य करते. हे दाखवून दिले गेले आहे. तुम्ही कोणाला गद्दार म्हणा किंवा इतर काही म्हणा. पण जे चित्र आज दिसत आहे. त्यात संभ्रम निर्माण करणारे अनेक प्रश्न आहेत. अशा प्रश्नांच्या आगीत भैय्याजी जोशी यांनी तेल ओतण्याचे काम केलेले आहे. घाटकोपरची भाषा गुजराती आहे. असे म्हणून मुंबईच्या ज्या ज्या भागात इतर भाषिक आहेत. त्या त्या भागाची भाषा तामिळ, तेलगू, कन्नड, बंगाली वगैरे आहे. असे जर म्हटले तर महाराष्ट्र आणि मुंबई यांची भाषा नेमकी कोणती आहे, असा प्रश्न साहजिकच उभा राहील. मुंबई कोणालाही उपाशी राहू देत नाही. त्यामुळे मुंबईत राज्या राज्यातून लोंढेच्या लोंढे येत असतात. कोरोनाच्या काळात महाराष्ट्रातून सन्मानाने पाठवलेल्या उत्तर प्रदेशच्या अनेक कामगारांनी महाराष्ट्राच्या बाहेर गेल्यावर त्यांचे काय हाल झाले. हे प्रत्यक्षात अनेक ठिकाणी कथन केलेले आहे. अशा सर्व परिस्थितीमध्ये मराठी जनांच्या मोठेपणाला आणि सर्वसमावेशी प्रवृत्तीला दुबळेपणा समजण्याचे कोणतेही कारण दिसत नाही. मुंबईमधील काही भागात गुजराती लोकांची वस्ती आहे. हे सत्य असले तरी 1960 सालामध्ये महाराष्ट्र आणि गुजरात अशी दोन राज्य मुंबई राज्यापासून निर्माण झालेली होती. त्यावेळी अनेक गुजराती नेत्यांना मुंबई गुजरातमध्ये हवी होती. ते न झाल्यास निदान मुंबई केंद्रशासित करावी, असे त्यांचे म्हणणे होते. पण संयुक्त महाराष्ट्राच्या विराट आंदोलनामुळे पंडित जवाहरलाल नेहरू यांनाही मुंबई महाराष्ट्राला द्यावीच लागली. त्याकाळी केंद्रीय मंत्री म्हणून अर्थ खाते सांभाळणारे चिंतामणराव देशमुख यांनी याच प्रश्नावर राजीनामा दिला होता. त्यामुळे त्यावेळी केंद्रीय मंत्री असलेले महाराष्ट्रातील हे चिंतामणी सबंध महाराष्ट्राचे 'कंठमणी' झाले होते. असे आचार्य प्र. के. अत्रे यांनी आपल्या मराठा दैनिकाच्या अग्रलेखात लिहून त्या चिंतामणरावांचा गौरव केला होता. अशा पार्श्वभूमीवर भैय्याजी जोशी यांच्यासारख्या वजनदार व्यक्तीने मुंबईची भाषा मराठी नाही. असे विधान करणे म्हणजे महाराष्ट्राच्या दुख ?या नसेवर बोट ठेवल्यासारखे आहे. भैय्याजी जोशी सध्या ज्या पदावर आहेत. त्या पदावर असताना त्यांनी अत्यंत संयमित विधान करणे गरजेचे होते. त्यांच्या एका वाक्यामुळे मुंबईत जो गदारोळ उडाला आहे. त्याची कितीही सारवासारव केली. तरी झालेले जे विधान आहे. ते झाले ते झालेच. भैय्याजींना त्यांनी काय बोलावे हे सांगायचा आमचा अधिकार नाही. ते अखिल भारतीय व्यक्तिमत्व आहे. त्यामुळे त्यांच्या सर्वभाषा समभावाच्या भावनेने बहुधा हे विधान केलेले असावे. पण त्यामुळे मुंबईमध्ये भाषा विवादाला तोंड फुटलेले आहे आणि अभिजात मराठीच्या अस्मितेला धक्का लागलेला आहे. हे मात्र त्यांना अत्यंत आदराने आम्हाला या ठिकाणी सांगावेसे वाटते. मराठी मुंबईचा विजय असो!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# भैय्याजी जोशींच्या विधानाचे विधानसभेत तीव्र पडसाद

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याजी जोशी यांनी केलेल्या वक्तव्यावरून विधानसभेत चांगलाच राडा झाला. उद्धव ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी आक्रमक पवित्रा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला.

भैय्याजी जोशी यांनी केलेल्या वक्तव्यावर राज्य सरकारची भूमिका काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यावर देवेंद्र फडणवीस यांनी देखील सरकारच्या वतीने बाजू स्पष्ट करत मराठी हीच महाराष्ट्राची राजभाषा असल्याचे म्हटले आहे. इतकेच नाही तर इतर भाषेचा देखील येथे सन्मान असल्याचे प्रत्युत्तर फडणवीस यांनी दिले आहे. मात्र या सर्व प्रकरणावर चर्चा सुरू असताना सभागृहात गोंधळ झाल्याने सभागृहाचे कामकाज पाच मिनिटांसाठी स्थगित करण्यात आले होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याजी जोशी यांनी घाटकोपर येथील सभागृहामध्ये निवेदन करताना महाराष्ट्रामध्ये प्रत्येकाला मराठी बोलता आलीच पाहिजे, अशी आवश्यकता नसल्याचे म्हटले होते. यावरून विरोधकांनी सरकारला घेरले. काँग्रेससह मविआतील घटक पक्ष आणि बाहेर मनसेनेही यावरून जोशी यांच्यावर टीकेचा भडीमार केला.

भैय्याजी जोशी यांचे वक्तव्य मी ऐकलेले नाही. त्यामुळे ते पूर्णपणे ऐकून त्यावर माहिती घेऊन बोलणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.




दुसरीकडे, वादग्रस्त विधान केल्यानंतर भैय्याजी जोशी यांनी स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणाले, मी केलेल्या एका विधानामुळे गैरसमज झाला आहे असे मला वाटत आहे. महाराष्ट्राची भाषा मराठी आहे आणि मुंबई हा महाराष्ट्राचाच भाग आहे, त्यामुळे मुंबईची भाषा मराठी याबाबत दुमत असल्याचे काहीही कारण नाही. भारताचे एक विशेषतः आहे की येथे विविध भाषा बोलणारे लोक परस्परांना सोबत घेऊन चालतात. त्यांच्यात भाषेमुळे प्रश्न निर्माण होत नाही.

## प्रीपेड मीटरवर बंदी

### इलेक्ट्रॉनिक मीटर बसवणार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ६ :** राज्यातील वीज ग्राहकांसाठीच्या प्रीपेड वीज मीटरवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. त्याऐवजी आता इलेक्ट्रॉनिक मीटर प्रणाली बसवली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.



प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य विक्रम काळे यांनी राज्यातील वीज ग्राहकांकडे स्मार्ट प्री-पेड वीज मीटरबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना फडणवीस बोलत होते.

ते म्हणाले,इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्याचे काम सुरू आहे. इलेक्ट्रॉनिक मीटर वापरणा-या ग्राहकांना वीज वापरावर १० टक्के सवलत देण्यात येणार आहे. तसेच सहा महिन्यांच्या कालावधीत हा बदल अंमलात आणण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम राबवला जाणार आहे. लवकरच राज्यभरात इलेक्ट्रॉनिक मीटर सिस्टम कार्यान्वित करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

## कोळसा खाणीत दबून ३ कामगारांचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, बैतुल, दि. ६ :** मध्य प्रदेशच्या बैतुलमधील कोळसा खाणीत दबल्यामुळे तीन कामगारांचा मृत्यू झाला. तिघांचेही मृतदेह खाणीतून बाहेर काढण्यात आले आहेत.

गुरुवारी दुपारी ३ वाजता वेस्टर्न कोल फील्ड्स लिमिटेड पाठाखेडा परिसरात हा अपघात झाला. येथे, कामगार छत्तरपूर-१ खाणीच्या तोंडापासून सुमारे ३.५ किमी आत, कॉन्टूर मायनर विभागात काम करत होते. या दरम्यान छत कोसळले.

कोळसा खाणीचे १० मीटर छत कोसळल्याचे सांगण्यात येत आहे. माहिती मिळताच बचाव पथक आणि रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचल्या. बचाव पथकाने खाणीतून तीन मृतदेह बाहेर काढले आहेत.

मृत कर्मचाऱ्यांमध्ये खाण सरदार, ओव्हरमन आणि सेक्शन इन्चार्ज यांचा समावेश आहे. हा विभाग जॉय मायनिंग सर्व्हिसचा आहे. त्यात एक ऑस्ट्रेलियन मशीन बसवले आहे. ही कंपनी कोलकाता येथे आहे. छतरपूर वनखाणीत कंट्यूनर मायनर मशीन चालू होती. कोळसा तोडत असताना अचानक खाणीचे छत कोसळले.









# भैय्याजी जोशी चिल्लर माणूस म्हणून जाहीर करा

## उद्धव ठाकरे यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांना आव्हान

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ६ :**
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईची कोणतीही एक भाषा नसल्याचा दावा करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भैय्याजी जोशी यांचा चिल्लर माणूस म्हणून उल्लेख केला आहे. या प्रकरणी त्यांनी सरकारवर टीकेची झोड उठवत भैय्याजी जोशी यांच्यावर राजद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. मुख्यमंत्र्यांनी भैय्याजी जोशी हा माणूस चिल्लर म्हणून जाहीर करावा किंवा तो बंदा रुपया असेल तर त्याच्यावर राजद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, असे ते म्हणालेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भैय्याजी जोशी यांनी बुधवारी मुंबईची कोणतीही एक भाषा नसल्याचे विधान करत घाटकोपरची भाषा ही गुजराती असल्याची मुक्ताफळे उधळली होती. उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी विधिमंडळ परिसरात पत्रकारांशी बोलताना भैय्याजी जोशी यांच्या विधानाचा चांगलाच समाचार घेतला. ते म्हणाले, काल महायुतीच्या आमदारांसाठी छावा चित्रपटाचा खास खेळ आयोजित करण्यात आला होता. मी त्याचे कौतुक केले होते. पण गद्दारांनी त्याला दांडी मारली. पण ही सर्व लोक छावा चित्रपट पाहत असताना काही अणाजी पंत इकडे मुंबईत येऊन मराठी अमराठी अशा वादाचा विष पेरून गेलेत. दुर्दैवाने आता छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज पुन्हा जन्माला येऊ शकत नाहीत. पण महाराष्ट्रात फूटी पाडणारे औरंगजेब व औरंगजेबाला मदत करणारे अणाजी पंत याही जमान्यात जन्माला आलेत. यासारखे दुर्दैव असू शकत नाही.



**हा संघाचा व भाजपचा छुपा अजेंडा**

सध्या काही लोक ब्रह्मदेवाला आम्हीच जन्म दिला अशा अविर्भावात फिरत आहेत. ते जगभर ब्रह्मज्ञान सांगत फिरत असतात. त्यातलेच एक असणाऱ्या भैय्याजी जोशी यांनी मुंबईत येऊन इथे राहणाऱ्यांना मराठी येण्याची काहीच गरज नाही असे द्वेषाचे गोमूत्र शिंपडून गेले. याचा अर्थ असा की, हा संघाचा व भाजपचा छुपा अजेंडा आहे. यांचे दाखवायचे व खायचे दात वेगळे आहेत. गत काही दिवसांपासून या लोकांनी हिंदुस्तान - पाकिस्तान काढला नाही. आता त्यांनी बटेंगे तो कटेंगे हा विषय काढला आहे. बटेंगे तो कटेंगे म्हणजे केवळ हिंदू -मुस्लीम नाही तर मराठी व अमराठी, पुन्हा मराठीत मराठे व मराठेत्तर अशी सगळी वाटणी करायची आणि राज्य बळकावयाचे हा त्यांचा डाव आहे.

**मुंबईत गल्लीवार प्रांतरचना करण्याचा प्रयतक**

उद्धव पुढे म्हणाले, आपल्या देशात भाषावर प्रांतरचना करण्यात आली आहे. आता हे मुंबईत गल्लीवार प्रांतरचना करण्याचा प्रयतक करत आहेत. हा तोडा, फोडा व राज्य कराचा प्रकार आहे. ही अत्यंत घाणेरडी व विकृत मानसिकता सर्वांपुढे आली आहे. काल ज्या प्रमाणे विधानपरिषदेत मुख्यमंत्री बोलले की, कोरटकर-कोरटकर काय बोलता? कोरटकर हा चिल्लर माणूस आहे. आता त्यांनी भैय्याजी जोशी हे सुद्धा चिल्लर माणूस आहे हे म्हणून दाखवावे. त्यांनी भैय्याजी जोशी हा चिल्लर माणूस आहे म्हणून जाहीर करावे किंवा हा चिल्लर किंवा बंदा रुपया काय आहे ते त्याच्यावर राजद्रोहाचा गुन्हा दाखल करा.

**अभिजात भाषेचा दर्जा देऊन उपकार केले नाही**

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला म्हणजे तुम्ही काही उपकार केले नाहीत. कारण, मराठी भाषेचे महत्त्व संघ किंवा भाजपला कळले नसले तरी इंग्रजांना कळले होते. कारण, सरकारचे डोके ठिकाणावर आहे का? हा जो अग्रलेख लोकमान्यांनी लिहिला होता तो मराठीत होता. तसेच आम्हीच आमच्या राज्य सरकारला विचारतो की, तुमचे डोके ठिकाणावर आहे का? कारण, मराठी माणसांनी आपले बलिदान देऊन मुंबई मिळवली आहे. मला संघ व भाजपला सांगायचे आहे की, जेव्हा केव्हा मुंबईवर संकट येते तेव्हा आम्ही सर्वजण महाराष्ट्राचे नागरीक म्हणून एकमेकांना वाचवण्यासाठी पुढे येतो. मग तो अतिरेकी हल्ला असो, नैसर्गिक संकट असो की अन्य एखादे संकट असो आम्ही एकजूट होतो.

**मुंबई चांगले काम करून जिंका, विष कालवून नाही**

हे लोक वात लावून पळतात. कोरोनाच्या काळातही आम्ही सर्वांना आपलेपणाने जपले होते. त्यामुळे तुम्हाला साखर टाकता येत नसेल तर मिठाचा किंवा विषाचा खडा टाकू नका. मुंबई एक चांगली महानगरी आहे ती जिंकायची असेल तर चांगले काम करून जिंका, विष कालवून जिंकू नका. तुम्हाला स्पर्धा करायची असेल तर चांगल्या कामाची स्पर्धा करा. मुंबईत शिवसेनेने जागतिक रक्तदानाचा विक्रम केला होता. संघाने असे एखादे काम करून दाखवावे. आम्ही त्यांच्या विधानाचा निषेध करतो. अशी विषवल्ली या सरकारने वेळीच ठेचली पाहिजे. भाजप आता उत्तर विरुद्ध दक्षिण असा देश तोडत आहे, असेही उद्धव ठाकरे यावेळी भैय्याजी जोशींचा समाचार घेताना म्हणाले.

## मराठी आहोत याचे भान भैयाजी जोशींना नाही का?

### मराठी भाषेसाठी राज ठाकरे मैदानात



■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ६ :**
मराठी भाषेवर बोलताना भैय्याजी जोशी यांनी आपण मराठी आहोत याचे मान सोडावे? असा प्रश्न महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

जोशीबुवांनी अशा काड्या करू नये, अशा शब्दात त्यांनी या वक्तव्याचा समाचार घेतला.

इतकेच नाही तर या वक्तव्याचा भाजप निषेध करणार आहे का? असा प्रश्न विचारत त्यांनी भाजपला देखील आव्हान दिले आहे.

या संदर्भात राज ठाकरे यांनी एका पोस्टच्या माध्यमातून भाजप आणि भैय्याजी जोशी यांच्यावर टीका केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना या विधानाचा निषेध नोंदवत असल्याचे देखील ते म्हणाले. इतकेच नाही तर मराठी माणूस हे वाक्य कधीही विसरणार नाही, हे जोशीबुवांनी लक्षात ठेवावे, असे देखील राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

यावर सविस्तर ३0 तारखेला गुढीपाडव्याच्या मेळाव्यात बोलणार असल्याचा इशारा देखील राज ठाकरे यांनी दिला आहे.

## मुंबई-पुणेजुन्या महामार्गावर टोलमाफी द्यावी प्रविण दरेकरांची सूचना

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ६ :**
अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी आज विधानपरिषदेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदन प्रस्तावावरील चर्चेची सुरुवात भाजप गटनेते प्रविण दरेकर यांनी केली. महायुती सरकारच्या विविध निर्णयांचे वर्णन त्यांनी आता महाराष्ट्र थांबणार नाही या शब्दात करुन प्रामुख्याने मराठी भाषेचा प्रसार, मुंबई व कोकण विकासाचे प्रश्न मांडून ठोस उपाययोजना करण्याची विनंती सरकारला केली.

दरेकर म्हणाले की, राज्यपालांच्या अभिभाषणातून मुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांच्या सरकारचा रोडमॅपच जनतेसाठी खुला केला आहे. हे सरकार सर्वसामान्यांना, शेतकऱ्यांना, महिलांना, बेरोजगारांना आधार देणारे सरकार आहे. म्हणूनच जनतेने विचारपूर्वक राज्याचा कारभार महायुतीच्या हातात दिलाय. जनतेच्या विश्वासाला महायुती सरकार तडा जाऊन देणार नाही, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.



**कर्नाटक सरकारचा निषेध**

कर्नाटकात कन्नड वेदिका रक्षक संघटनेने महाराष्ट्रातील एसटीच्या मराठी चालकाच्या तोंडाला काळे फासून मराठी भाषेचा अपमान केला, त्या चालकाला मारहाण केल्याची घटना घडली होती. या घटनेला सभागृहात वाचा फोडताना दरेकर म्हणाले कि, विविध जाती, धर्म, पंथ, भाषा असणारा हा भारत देश आहे. महाराष्ट्रात कोणत्याही भाषेचा अवमान केला जात नाही. असे असताना कर्नाटकात मात्र मराठी भाषेचा अपमान केला गेला. कर्नाटक सरकारची फुस होती किंवा कसे, हा चौकशीचा भाग आहे. पण मी या सभागृहात कर्नाटक सरकारचा जाहीर निषेध करतो. सीमा वाद कोर्टात असताना सातत्याने कर्नाटक सरकारकडून मराठी भाषिकांना त्रास दिला जातो, त्यांचा अपमान केला जातो. महाराष्ट्र हे कधीही खपवून घेणार नाही, हा संदेश कर्नाटक सरकारपर्यंत गेला पाहिजे. सीमावर्ती भागात राहणाऱ्या मराठी भाषिकांना राज्यपालांच्या अभिभाषणात सुरुवातीलाच स्थान देण्यात आले आहे, यावरुन हा विषय महाराष्ट्र सरकारच्या किती जिव्हाळ्याचा आहे, हे दिसून येतं.

**जिवती तालुक्यातील १४ गावे महाराष्ट्राचीच**

महाराष्ट्रातील गावातील नागरिकांची ई-केवायसी तेलंगणा सरकारने परस्पर करुन टाकल्याची घटना मागील काळात घडली होती. हाही विषय दरेकर यांनी सभागृहात उपस्थित केला. केंद्र सरकारने वन नेशन वन राशन कायदा लागू केला आहे. त्यासाठी ई-केवायसीकरणे बंधनकारक आहे. महाराष्ट्रातील गावातील नागरिकांची ई-केवायसी तेलंगणा सरकारने परस्पर करुन टाकली.

## पुरोगामी महाराष्ट्रात गुंडांना स्थान नाही : योगेश कदम

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ६ :**
आपल्या पुरोगामी महाराष्ट्रात गुंडांना स्थान नाही. सतीश भोसले सारख्या गुंडांना जेरबंद केले जाईल, त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल असे मंत्री योगेश कदम यांनी म्हटले आहे.मंत्री योगेश कदम पुढे बोलताना म्हणाले की, हा संताचा महाराष्ट्र आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जिथे स्वराज्य स्थापण केले त्या महाराष्ट्रात अश्या गोष्टी खपवून घेतल्या जाणार नाहीत. पोलिस भोसलेवर नक्की कारवाई करतील.

गाडेला कठोर शिक्षा देणार

योगेश कदम म्हणाले की, सोशल मिडीयावर लक्ष ठेवत कारवाई करण्यासाठी आमचे स्पेशल युनीट आहेत. त्या मार्फत त्याच्यावर कारवाई केली जाईल. दत्तात्रय गाडे याची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. यापूर्वी त्यांच्यावर ४२0 आणि चोरीचे गुन्हे ग्रामीण भागात दाखल आहेत. शहरातही त्याच्यावर एक गुन्हा दाखल आहे. अशा प्रवृत्तीच्या व्यक्तीला वाचवण्याचा प्रश्नच नाही, असे म्हणत



कदमांनी विरोधकांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले आहे. गाडेवर कठोर कारवाई झाली पाहिजे, यासाठी गृहविभाग काम करणार आहे.

**महापेत अत्याधुनिक सायबर सुरक्षा केंद्र**

सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी नवी मुंबईच्या महापे येथे अत्याधुनिक सायबर सुरक्षा केंद्र उभारले जात आहे. येथे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि क्लाउड आधारित प्रणालींचा वापर केला जाणार आहे. राज्यातील ५0 सायबर पोलिस ठाणे या प्रणालीशी जोडले जाणार असून, सायबर फसवणूक झाल्यास त्वरित कारवाई करता येणार आहे, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली.

## भाजपच्या पोटातले ओठात आले जोशींवर कारवाई करा : आदित्य ठाकरे

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ६ :**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भैय्याजी जोशी यांनी बुधवारी मुंबईची कोणतीही एक भाषा नसल्याचे विधान करत घाटकोपरची भाषा गुजराती असल्याची मुक्ताफळे उधळली होती. त्यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे व आमदार वरुण सरदेसाई यांनी भाजपवर टीकेची झोड उठवली आहे. भैयाजी जौशी यांच्या विधानावरून भाजपच्या पोटातील ओठात आले असून, त्यांचा मुंबई तोडण्याचा डाव स्पष्ट झाला आहे, असे ते म्हणालेत. भैय्याजी जोशी बुधवारी एका कार्यक्रमात बोलताना म्हणाले होते की, मुंबईची कुठलीही एक भाषा नाही. मुंबईच्या अनेक भाषा आहेत. वेगवेगळ्या भागांत वेगवेगळी भाषा असते. जशी घाटकोपर परिसराची भाषा गुजराती आहे. त्याचप्रमाणे तुम्हाला गिरगावात हिंदी बोलणारे कमी सापडतील.

तिथे तुम्हाला मराठी भाषा बोलणारे लोक दिसतील. मुंबईत येणाऱ्या व्यक्तीने मराठी शिकले पाहिजे असे काही नाही.उल्लेखनीय बाब म्हणजे मुंबईसह आसपासच्या भागात अलीकडच्या काळात सातत्याने मराठी भाषिकांवर परप्रांतीयांकडून हल्ले होण्याच्या घटनांत वाढ होत आहे. त्यातच जोशी यांनी हे विधान केल्यामुळे मोठा संताप व्यक्त केला जात आहे.ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी भैय्याजी जोशी यांच्या विधानावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. त्यांनी या प्रकरणी थेट सत्ताधारी भाजपवर टीका केली आहे. काल भैय्याजी जोशी यांनी घाटकोपरची भाषा गुजराती



असल्याचा दावा केला. आज तुम्हाला कळले असेल की, बुलेट ट्रेन का करत आहेत? कुणासाठी करत आहेत? तामिळनाडू व केरळ आपल्या भाषेबद्दल अभिमान का बाळगतात? आपल्याकडे लाखो लोक रोजगारासाठी येतात. पण मुंबईची भाषा मराठीच आहे. हे भय्याजी जोशी यांनी जाणून घ्यावे. त्यांनी त्यांच्या विधानासाठी माफी मागावी.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अवमानास्पद विधान करणाऱ्या प्रशांत कोरटकर व राहुल सोलापूरकर यांच्यावर कारवाई करण्याची आमची मागणी आहे. आता भैय्याजी जोशी यांच्यावरही कारवाई करण्याची आमची मागणी आहे. मुंबईत अनेकजण मोठे होण्याची स्वप्न घेऊन येतात. पण मुंबईची भाषा मराठीच आहे हे भैय्याजी जोशी यांना सांगण्याची गरज आहे. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी आपली भूमिका मांडली. आम्ही त्याचे स्वागत करतो, असे आदित्य ठाकरे म्हणाले. ते पुढे म्हणाले, खरी परिस्थिती ही आहे की राज्यात मराठी भाषा भवन आपण मरिन ड्राईव्हला करत होतो. त्याला या सरकारने स्थगिती दिली.

## जलसंपदा विभागात मोहित कंबोजची चलती अंबादास दानवे यांचा सभागृहात आरोप

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ६ :**
भाजप नेते मोहित कंबोज यांना विचारल्याशिवाय राज्याच्या जलसंपदा विभागाचे पानही हलत नसल्याचा गंभीर आरोप विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी गुरुवारी सभागृहात केला. ग्रामीण भागाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असणाऱ्या जलसंपदा व जलसंधारण खात्यात एखाद्या अधिकाऱ्याला फोन केला तर त्यावर निर्णय मोहित कंबोज घेतो. या विभागात त्याने हस्तक्षेप करण्याचे कारण काय? असा सवाल दानवे यांनी यासंबंधी उपस्थित केला आहे.



अंबादास दानवे आज सभागृहात बोलताना म्हणाले की, भाजपच्या मोहित कंबोज नामक पदाधिकाऱ्याला विचारल्याशिवाय राज्याच्या जलसंपदा व जलसंधारण खात्याचे पानही हालत नाही. हा विभाग ग्रामीण भागाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा आहे. याविषयी आपण एखाद्या अधिकाऱ्याला फोन केला तर त्यावर निर्णय मोहित कंबोज घेतो.

## अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार ; ५ आरोपींना अटक

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ६ :मुंबई**
पुण्याच्या स्वारगेट येथे महिलेवर झालेल्या बलात्काराची घटना ताजी असतानाच आता मुंबईच्या जोगेश्वरी परिसरात माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडल्याचे समोर आली आहे. पोलिसांनी ५ जणांना बेड्या ठोकल्या असून अधिक तपास सुरू आहे.दरम्यान २४ फेब्रुवारीला शाळा सुटल्यापासून ती बेपत्ता होती. २६ फेब्रुवारीला मुलीच्या काकांनी मुलीचे अपहरण झाल्याची तक्रार पोलिसात केली. त्यानंतर २७ तारखेच्या सकाळी ही पीडिता दादर रेल्वे स्थानकाजवळ आढळली. रेल्वे पोलिसांनी तिला ताब्यात घेतले.



**नेमके काय घडले?**

पीडित मुलगी तिच्या काकांसोबत राहते. २४ फेब्रुवारी रोजी शाळा सुटल्यानंतर ती बेपत्ता झाली होती. २४ फेब्रुवारीच्या दिवशी ती बेपत्ता झाली होती. अटक करण्यात आलेले आरोपी हे एसी मेकॅनिक आहेत. शाळा सुटल्यानंतर मुलगी एकटी असल्याचे बघून आरोपी तिला जोगेश्वरीतील संजय नगर भागातील घरी घेऊन गेले आणि त्यानंतर या नराधमांनी मुलीवर आळीपाळीने बलात्कार केला. त्यानंतर २७ फेब्रुवारीला पीडित मुलगी रेल्वे पोलिसांना दादर स्थानकात सैरभैर अवस्थेत सापडली. रेल्वे पोलिसांनी तिला जोगेश्वरी पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांच्या चौकशीत तिच्यावर जोगेश्वरी परिसरात लैंगिक अत्याचार झाल्याची माहिती मिळाली. यावरून पाच जणांना पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी सीसीटीव्हीच्या मदतीने पोलिस अधिक सुरू आहे.

**पाचही आरोपी अनोळखी**

तपासाशी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, पाचही आरोपी अनोळखी असल्याचा दावा विद्यार्थिनीने केला आहे.

## १९३ कोटींची भरपाई मंजूर, कांदा, डाळिंब, द्राक्ष, सोयाबीन, भाजीपाला, मक्याला फटका : चांदवड

■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ६ :**
ते ऑक्टोबर- मध्ये अतिवृष्टीव अवकाळी पावसामुळे संपूर्ण नाशिक जिल्ह्यात एकूण ,, शेतकऱ्यांच्या ,, हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले होते. या नुकसानीची कोटी लाखाची रुपये भरपाई मंजूर झाली आहे. तर चांदवड-देवळामतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी कोटी लाख रुपये भरपाई राज्य शासनामार्फत मंजूर झाली आहे.

ऑक्टोबर- मध्ये अवकाळी पावसामुळे चांदवड - देवळा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात शेतीपिकांचे नुकसान झाले होते. काही ठिकाणी शेत जमिन वाहून गेली होती. काही गावांमध्ये बंधारे फुटल्याने रस्ते ही वाहनू गेले होते. त्याचबरोबर लाल कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी संकटात सापडले होते. यात चांदवड तालुक्यातील , बाधित शेतकऱ्यांच्या , हेक्टर क्षेत्राचे तर देवळा तालुक्यातील , बाधित शेतकऱ्यांचे एकूण , हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले होते. तर यात शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेल्या कांदा, डाळिंब, द्राक्ष, सोयाबीन, भाजीपाला, मका या प्रमुख शेतीपिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले होते. या नुकसानीचे शासकीय यंत्रणेमार्फत तत्काळ पंचनामे करण्यात येऊन नुकसानभरपाई मिळण्यासाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. बुधवारी (दि. मार्च) राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाच राज्य शासनामार्फत संपूर्ण नाशिक जिल्ह्यासाठी कोटी लाखाची रुपये नुकसानभरपाई मंजूर झाल्याचे जाहीर करण्यात आले, असे मतदारसंघाचे आमदार डॉ. राहुल आहेर यांनी सांगितले. ऑक्टोबर मध्ये झालेल्या नुकसानाची . कोटी रुपये चांदवड तालुक्यासाठी व . कोटी रुपयेदेवळा तालुक्यासाठी असेएकूण कोटी लाख रुपयेमंजूर करून अदा करण्यात आले आहे.

## नाशिक विमानतळावर होणार नवीन धावपट्टी शासनाची मंजुरी, काम पूर्ण होण्यास २ वर्षे लागणार

■ महासागर प्रतिनिधी
**नाशिक, दि. ६ :**
राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयतकांतून नाशिक विमानतळावर नवीन धावपट्टीस मंजुरी मिळाली आहे.

नाशिक विमानतळावरील सध्या अस्तित्वात असलेल्या धावपट्टीला समांतर अशी नवीन धावपट्टी निर्माण करण्याचा निर्णय हिंदुस्तान एरोनॉटिक्सने (-)घेतला असून या धावपट्टीसाठी २00 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे नाशिक विमानतळाच्या विकासासाठी गती मिळणार असून नाशिकमध्ये हवाई वाहतुकीसाठी मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी यांनी १६ जुलै २0२४ व २१ जानेवारी २0२५ रोजी केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंग यांना पत्र लिहून इंडिया मिडल ईस्ट इकॉनॉमिक कॉरिडॉर () अंतर्गत या धावपट्टीला मंजुरी देण्याची मागणी केली होती. या मागणीनंतर केंद्रीय गृहमंत्रालयाने आंतरराष्ट्रीय प्रवाशांच्या पडताळणी




सुविधेसाठी हिंदुस्तान एरोनॉटिक्सला मान्यता दिली आहे.यामुळे भविष्यात नाशिक विमानतळावरून आंतरराष्ट्रीय विमान सेवाही सुरू करणे शक्य झाले आहे.या निर्णयामुळे छगन भुजबळ यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहे.

**विमानतळाची उड्डाणक्षमता अधिक वाढणार**

छगन भुजबळ यांच्या मागणीनुसार हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडच्या संचालक मंडळाने या नवीन धावपट्टीच्या निर्मितीसाठी २00 कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे नाशिक शहराची भविष्यातील गरज पाहता विमानतळाची उड्डाणक्षमता अधिक वाढणार आहे.

या निर्णयानंतर नवीन धावपट्टीचे आरेखन व इतर तांत्रिक बाबींसाठी हिंदुस्तान एरोनॉटिक्सकडून सल्लागार एजन्सीची नियुक्ती करण्यात आली असून, संबंधित एजन्सीकडून तांत्रिक सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.

**धावपट्टीचे काम पूर्ण होण्यास २ वर्षे लागणार**

सध्या अस्तित्वात असलेल्या धावपट्टीला समांतर धावपट्टी तयार करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे.

तांत्रिक सर्वेक्षण पूर्ण होताच ही धावपट्टी तयार करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवली जाईल. लवकरच या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होणार आहे. या धावपट्टीचे काम पूर्ण होण्यास साधारणतः २ वर्षांचा कालावधी लागणार आहे.नवीन धावपट्टी ही सध्याच्या धावपट्टीप्रमाणेच ३ किलोमीटर लांब व ४५ मीटर रुंद असणार आहे.

२0२२ साली धावपट्टीची डागडुजी सुरू असताना तब्बल १४ दिवस नाशिकचे विमानतळ ठप्प पडले होते, नवीन धावपट्टीच्या निर्मितीनंतर डागडुजी सुरू असतानाही विमानतळ सक्रिय ठेवणे शक्य होणार आहे.

तसेच हे काम पूर्ण झाल्यानंतर नाशिक देश विदेशातील हवाई नकाशावर जोडले जाणार असून नाशिकच्या विकासाला अधिक गती मिळणार आहे.

## सिन्नरला महिला आरोग्य सायकल सप्ताह



■ महासागर प्रतिनिधी
**मुंबई, दि. ६ :**
सिन्नर सायकलिस्टच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधत ज्या महिलांना सायकल चालवण्याची इच्छा आहे. मात्र, त्यांना सायकल येत नाही अशा महिलांसाठी खास महिला आरोग्य सायकल सप्ताह' आयोजित केला आहे, अशा महिलांसाठी बुधवार (दि. ), गुरुवार (दि. ) व शुक्रवार (दि. ) या दिवशी सायकलचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. बुधवारी पहिल्याच दिवशी या शिबिरात शहर व परिसरातील महिलांनी सहभाग घेत सायकल चालवण्याचे प्रशिक्षण घेतले.काही वर्षांपासून सिन्नर सायकलिस्टच्या वतीने विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये सामाजिक उपक्रमांसह तालुका, जिल्हास्तरीय स्पर्धांचेही आयोजन करण्यात येत असते. सुरुवातीला मोजक्या सायकलिस्टने ग्रुपची स्थापना करून सायकल स्पर्धांमध्ये भाग घेण्यास सुरुवात केली होती. मात्र, दोन-तीन वर्षांमध्ये या ग्रुपमध्ये शेकडो सायकलिस्ट सभासद झाले आहेत. सायकल चालविल्यामुळे होणारे फायदे, सायकलमुळे होणार व्यायाम, प्रदूषणात न पडणारी भर यांसह अनेक सामाजिक संदेश देत हे सायकलिस्ट दररोज सायकल चालवत असतात. तसेच देशभरासह परदेशात होणाऱ्या सायकल स्पर्धांमध्येही येथील सायकलिस्टने आपले नाव मिळवले आहे. पुरुषांबरोबरच ग्रुपमध्ये महिला सभासदांची संख्या वाढावी, महिलांना सायकल चालविल्यामुळे व्यायाम व्हावा व ज्यांना सायकल येत नाही त्यांनाही सायकल चालवता यावी यासाठी महिला दिनाचे औचित्य साधत महिला आरोग्य सायकल सप्ताह याचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात पहिल्याच दिवशी महिलांनी सहभाग घेत सायकल चालविण्याचे प्रशिक्षण घेतले. पुढील तीन दिवस त्यांना सायकल चालवण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. डॉ ज्योती मोरे, वंदना सोनवणे, योगिता कांडेकर, अश्विनी आरोटे, धनश्री शिंदे आदींनी महिलांना सायकल चालविण्याचे प्रशिक्षण दिले.

## राज्य सरकारकडून प्रलोभनांचा उल्लेखही नाही जयंत पाटील यांचा घणाघाती आरोप

■ महासागरप्रतिनिधी
**मुंबई, दि. ६ :**
राज्यपालांच्या अभिभाषणावर विधानसभेत चर्चा सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे प्रदेशाध्यक्ष आणि विधीमंडळ पक्षनेते जयंतराव पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली. राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण प्रचंड वाढले असून, हत्या आणि हल्लयांचे प्रमाण चिंताजनक आहे. हे धाडस गुन्हेगारांना कुठून मिळते? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच, सरकारने सत्तेवर येण्यासाठी लोकांना दिलेल्या आश्वासनांचा आणि प्रलोभनांचा राज्यपालांच्या भाषणात उल्लेखही नव्हता, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**दावोस गुंतवणुकीचा खेळ फसवा?**

जयंत पाटील यांनी सरकारच्या दावोस दौऱ्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना सांगितले की, प्रत्येक वेळी मोठ्या गुंतवणुकीचे आणि रोजगार निर्मितीचे दावे केले जातात, पण प्रत्यक्षात त्याचा फायदा किती झाला? गेल्या तीन वर्षांत महाराष्ट्रात लाख तरुणांना रोजगार मिळणे अपेक्षित होते, मात्र बेरोजगारी आणखीच वाढली आहे. याचा हिशेब सरकारने द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

**गुंडगिरी वाढली, उद्योजक असुरक्षित!**

राज्यात उद्योगांना प्रोत्साहन मिळण्याऐवजी स्थानिक गुंडांकडून उद्योजकांना संरक्षण द्यावे लागत आहे. गुंडगिरीचे प्रमाण वाढले असून, छोट्या दुकानदारांपासून मोठ्या उद्योगांपर्यंत खंडणी द्यावी लागते. यामुळे गुंतवणूकदार महाराष्ट्र सोडून बाहेर जात आहेत. निर्भय वातावरण निर्माण करण्यासाठी सरकारने तत्काळ पावले उचलावीत, अशी मागणी पाटील यांनी केली.महाराष्ट्राची अर्थव्यवस्था घसरतेय मोदी सरकारच्या अहवालातून धक्कादायक माहित देशाच्या सकल उत्पन्नात () महाराष्ट्राचे योगदान .% ने घटले असून, गुजरातच्या तुलनेत राज्य मागे पडत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इकॉनॉमिक डव्हायजरी कमिटीच्या अहवालातही महाराष्ट्राच्या आर्थिक घसरणीबाबत धक्कादायक बाबी नमूद केल्या आहेत. याकडे लक्ष देण्याऐवजी सरकार केवळ मोठमोठ्या घोषणा करण्यात व्यस्त आहे, असेही पाटील यांनी सांगितले.

# अमरावतीतही साडेचार हजार बांगलादेशींना बनावट कागदपत्रांच्या आधारे जन्मदाखले

## किरीट सोमय्यांचा आरोप

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** – अमरावतीत महापालिका क्षेत्रात सुमारे 4 हजार 500 बांगलादेशी, रोहिंग्यांना बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रशासनाने जन्मदाखले दिल्याचा आरोप भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी गुरूवारी येथे प्रसार माध्यमांशी बोलताना केला.

किरीट सोमय्या यांनी आज येथील गाडगेनगर पोलीस ठाण्यात पोहचून पोलीस उपायुक्त आणि पोलीस निरीक्षकांसोबत चर्चा केली. किरीट सोमय्या म्हणाले, मी आज 468 पानांचे पुरावे पोलिसांकडे सादर केले आहेत.



त्यात दोन प्रकारच्या याद्या आहेत. पन्नास अशी प्रकरणे आहेत, ज्यात या लोकांनी आपला जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी कोणतेही अधिकृत कागदपत्र सादर केले नाही. दुसरी पन्नास लोकांची अशी यादी आहे, की ज्यांनी केवळ आधारकार्ड जोडले आहे. पोलिसांनी आज माझा अधिकृत जबाब नोंदवून घेतला आहे. हा जबाब प्रथम माहिती अहवालात जोडून घेण्यात आला आहे. किरीट सोमय्या म्हणाले, अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या विरोधात मी केंद्र सरकारकडे तक्रार केली आहे. आम्ही जन्मदाखल्याची अनियमितता तब्बल महिनाभरापुर्वी जिल्हाधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिली होती. पण, त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले. जन्मदाखले देण्याचे अधिकार हे तहसीलदाराकडे आहेत, मात्र जिल्ह्यात पाच ठिकाणी नायब तहसीलदार यांनी सुनावणी घेतली. त्यांनी दिलेले सर्व आदेश बेकायदेशीर आहेत.

### जिल्हाधिकाऱ्यांविरूद्ध केंद्रात तक्रार

अमरावतीत 4 हजार 500 हून अधिक जन्म प्रमाणपत्र दिले गेले आहेत, ते ताबडतोब रद्द करायला हवेत, ही मागणी मी पुन्हा एकदा केली आहे. मालेगाव मध्ये देखील असाच प्रकार उघडकीस आला आहे. मालेगावमध्ये 2 हजार 978 जन्म प्रमाणपत्र अशाच प्रकारे बनावट कागदपत्रांच्या आधारे देण्यात आले होते, ते आता रद्द करण्यात आले आहेत. अमरावतीतही हे 4 हजार 500 जन्म प्रमाणपत्रे रद्द होणार, असा आपल्याला विश्वास आहे, असे सोमय्या म्हणाले. देशात 1969 च्या कायद्यानुसार मॅजिस्ट्रेट कोर्टात अर्ज करून जन्म व मृत्यूची नोंद करता येत असल्याने 50 वर्षात बहुतांश नागरिकांनी ती प्रमाणपत्रे काढून घेतली. मात्र नोव्हेंबर 2023 मध्ये संसदेने या कायद्यात केलेल्या बदलामुळे जन्माचे दाखले देण्याचे अधिकारी तहसीलदारांना मिळाले. तेव्हापासून बनावट आधारकार्ड, रेशनकार्ड व इतर खोट्या कागदपत्रांआधारे हजारो बांगलादेशींनी अर्ज केले आणि तहसीलदारांनी त्यांना जन्मदाखले दिल्याचे गंभीर प्रकार महाराष्ट्रात समोर आले आहेत असे सोमय्या यांनी सांगितले.

# चांदूर बाजारात दहावी परीक्षेतील गणिताचा पेपर फुटला

## जिल्ह्यातील पहिला गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.6 )** – चांदूर बाजार येथील जिजामाता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्राजवळील सागर झेरॉक्स केंद्रातून 5 मार्च रोजी गणिताच्या उत्तरपत्रिका छापून विद्यार्थ्यांना दिल्या गेल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी चांदुरबाजार पोलिस ठाण्यात आरोपी शहेजाद खान शमशेर खान (50, रा. धर्मलपुरा, चांदूर बाजार) याच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम 223 अन्वये व महाराष्ट्र विद्यापीठ कायदा 1982 अन्वये परीक्षेत अवैध कृत्य करण्यास प्रतिबंध करण्याच्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चांदूर बाजार येथील जिजामाता विद्यालयाच्या परीक्षा केंद्रासमोरील सागर झेरॉक्समध्ये दहावीच्या गणिताच्या उत्तरपत्रिका झेरॉक्स करून काही विद्यार्थ्यांना मिळत असल्याची गोपनीय माहिती चांदूर बाजार पोलीस ठाण्याचे ठाणेदार संतोष टाले यांना मिळाली. या माहितीवरून दिनेश राठोड व गणेश आगोळे यांनी तेथे जाऊन पाहणी केली. त्यावेळी झेरॉक्स सेंटरवर मोठी गर्दी दिसली. पोलिसांना पाहून तेथे उपस्थित तरुणांनी तेथून पळ काढला. पोलिसांनी झेरॉक्स केंद्राची तपासणी केली असता त्यांना दहावीच्या गणिताच्या प्रश्नपत्रिकेच्या उत्तराची झेरॉक्स प्रत सापडली. प्रश्न क्रमांक 1 ची उत्तरे पान क्र. गणित विषयाच्या प्रश्नपत्रिकेची उत्तरपत्रिका जप्त करण्यात आली. जिजामाता विद्यालय ते सागर झेरॉक्स दुकान यांमधील अंतर 100 मीटरपेक्षा कमी आहे. जिजामाता विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी परीक्षेच्या काळात झेरॉक्स दुकान बंद ठेवण्याचे आदेश व नोटीस दिली होती, तरीही दुकान उघडे ठेवून उत्तरपत्रिकांची झेरॉक्स काढण्यात अन्यायकारक मार्ग अवलंबण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली असून पुढील तपास सुरू आहे.




### कॉपीमुक्त अभियानाला गालबोट

झेरॉक्सचे दुकान 100 मीटर अंतरावर सुरु होते. सकाळी 11 वाजता गणिताचा पेपर सुरू झाल्यानंतर काही वेळातच जिजामाता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रापासून 100 मीटर अंतरावर उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स उपलब्ध झाल्या. मात्र आता प्रश्नपत्रिका कशी निघाली याची संतप्त पालकांमध्ये चर्चा आहे. परीक्षा मंडळाकडून कॉपीमुक्त परीक्षेसाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या. मात्र ही धक्कादायक घटना उघडकीस आल्याने परीक्षा मंडळाच्या कॉपीमुक्त परीक्षेच्या अभियानाला गालबोट लागले आहे. यासोबतच प्रश्नपत्रिका कशी बाहेर आली आणि कोणत्या माध्यमातून, व्हॉट्स ?पच्या माध्यमातून ती कुठपर्यंत पोहोचली याचा तपास आता पोलिसांना करावा लागणार आहे.

# आदर्श गुप्ता हत्याकांडातील पाचवा आरोपी अटक

## वलगाव शेतशिवारातून केले अटक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )**– मसानगंज परिसरातील आदर्श गुप्ता यांच्या हत्याप्रकरणात नागपुरी गेट पोलिसांनी बुधवारी पाचवा आरोपी संकेत देविदास साहू (29) याला अटक केली. तो वलगावातील एका शेतशिवारात लपून बसला होता. त्याचवेळी पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. पोलिसांनी यापूर्वी घटनेच्या दिवशीच आरोपी कैलाश साहू, शैलेश साहू आणि पंकज साहू यांना अटक केली होती. तर मंगळवारी मुख्य आरोपी अभिषेक उर्फ बाबू देवीदास साहू याला नवसारी येथून अटक करण्यात आली.



रविवारी रात्री आदर्श गुप्ता याची मसानगंज परिसरात हत्या करण्यात आली. या घटनेनंतर नातेवाईकांचा रोष उपाळून आला होता. त्यानंतर रात्री उशिरा पोलिसांनी बडनेरा येथून हत्येतील आरोपी कैलास साहू, शैलेश साहू आणि पंकज साहू यांना अटक केली. पण मुख्य आरोपी अभिषेक साहू फरार होता. मंगळवारी नागपुरी गेटच्या डीबी पथकाला अभिषेक नवसारीत राहात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तात्काळ नवसारी गाठली आणि अभिषेक साहूला अटक केली. आरोपींच्या चौकशीदरम्यान पोलिसांनी वालगाव फार्म परिसरातून आरोपी संकेत साहूला अटक केली.

# दोन घरातून 10 लाखांच्या रोखीसह 11 तोळे सोने लंपास

- भरदिवसा रहाटगाव परिसरातील घटना
- प्रापर्टी ब्रोकर्सचे घर केले लक्ष्य

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )**– अज्ञात चोराने रहाटगाव परिसरातील दोन घरांना लक्ष्य करून, दिवसाढवळ्या 10 लाख रुपयांची रोख व 11 तोळे सोन्याचे दागिने चोरून नेले. ही घटना 5 मार्च रोजी दुपारी घडली. दोन्ही घटनांच्या अनुषंगाने नांदगावपेठ पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या दोन घरापैकी एक घर हे प्रापर्टी ब्रोकरचे आहे.

रहाटगाव परिसरातील राजमाता नगरात राहणारे दीपक भाऊराव फाळके (54) हे प्रॉपर्टी ब्रोकरचे काम करतात. त्यांची पत्नी लिपिक म्हणून काम करते. 4 फेब्रुवारी रोजी दीपकला त्याच्या शेती व्यवसायामुळे 9 लाख रुपये रोख मिळाले होते. त्यांनी स्वत:चे एक लाख रुपये आणि इसारचे नऊ लाख रुपये असे 10 लाख रुपये बेडरूमच्या कपाटात ठेवले होते. 5 मार्च रोजी सकाळी 10.15 वाजता ते पत्नीसह घरातून बाहेर निघाले. त्यानंतर सायंकाळी 6.15 वाजता ते घरी परतले असता त्यांना घराचे कुलूप तुटलेले दिसले. मी बेडरूममध्ये गेलो असता कपाट उघडलेले दिसले, त्यात 10 लाख रुपये रोख, 35 ग्रॅम मंगळसूत्र, 54 ग्रॅम मंगळसूत्र असा एकूण 15 लाख 34 हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला होता. याप्रकरणी दीपक फाळके यांनी नांदगावपेठ पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

# पुढील आदेशापर्यंत जिल्ह्यातील सीसीआयची कापूस खरेदी बंद

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** – गुरुवार 6 मार्चपासून अमरावतीमध्ये सीसीआयने अचानक सीसीआयमार्फत कापूस खरेदी थांबवली आहे, ज्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी संकटात सापडले आहेत. विशेष म्हणजे, सीसीआयने यापूर्वी 11 फेब्रुवारीपासून अमरावतीमध्ये कापूस खरेदी थांबवली होती. यानंतर, 28 फेब्रुवारी रोजी अमरावती जिल्ह्यातील केंद्रांवर कापसाची खरेदी सुरू करण्यात आली. पुढील आदेश येईपर्यंत अवघ्या सहा दिवसांत अमरावतीतील चार केंद्रांवर खरेदी थांबवण्यात आल्याने शेतकरी तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत.

कापसाचा हंगाम जवळजवळ संपला आहे. कापसाच्या दुसऱ्या खेपानंतर, सीसीआयने तांत्रिक कारणांमुळे 11 फेब्रुवारीपासून कापूस खरेदी थांबवली. तांत्रिक कारण असे दिले गेले की पोर्टलमध्ये समस्या होत्या. परंतु, केंद्रांवर येणाऱ्या कापसाच्या प्रमाणात घट होण्याची भीती असल्याने ही खरेदी थांबवण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. यानंतर, कसा तरी 28 फेब्रुवारी रोजी पुन्हा खरेदी सुरू झाली. पण ब्रेक फक्त सहा दिवसांत झाला. जास्त खरेदीमुळे कापूस साठवण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे. पण ते खरे कारण सांगण्यास तयार नाही. अमरावती एपीएमसीमध्ये, भातकुली येथे 2, नांदगाव पेठ येथे 1 आणि चांगापूर येथे 1 अशा चार केंद्रांवर सीसीआय द्वारे हमी किंमत 7411 रुपये प्रति क्विंटलपासून सुरू होत होती. पण आता ही



खरेदी 6 मार्चपासून थांबवण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. दोन बॅचनंतर खडबडीत दर्जाचा कापूस बाजारात येतो. 'सीसीआय हा कापूस खरेदी करत नाही.' पहिल्या दोन बॅचमधून कापूस खरेदी करतानाही, सीसीआयने दुसऱ्या बॅचमधून कापसाची हमी किंमत रु. ने कमी केली. शेतकऱ्यांना पहिली गोष्ट हवी होती ती म्हणजे सीसीआय हमी दरापेक्षा कमी दर. पहिल्या खेपातील बहुतेक कापूस सीसीआयने हमी दराने खरेदी केला आहे. त्यामुळे खाजगी बाजारपेठेतील व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. दुसऱ्या तुकडीतील काही कापूस व्यापाऱ्यांनी खरेदी केला आहे. दरम्यान, सीसीआयने कापूस खरेदी थांबवली. याचा फायदा घेत व्यापाऱ्यांनी कापसाचे भाव कमी करण्यास सुरुवात केली आहे आणि म्हटले आहे की प्रति किलो कापसाच्या दोन किलो कमी उत्पादन होत आहे. सीसीआयला 34 किलोपर्यंत कापसाचा अर्क लागतो. काही शेतकऱ्यांनी 38 किलोपर्यंत कापूस काढला आहे.

# गटई व्यवसायासाठीचे 22 खोके जप्त

**अनेकांनी थाटले बनावट गटई खोके | महापालिका आणि समाजकल्याण विभागाने संयुक्त कारवाई**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 6 )** – समाजकल्याण विभागाच्या वतीने गटई कामगारांना निळे खोके वाटप करण्यात आले होते. परंतू अनेकांनी या खोक्याचा गैरवापर करीत वेगळेच व्यवसाय थाटले. अशातच काही जणांनी तर बनावट खोके सुध्दा तयार केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे गुरुवारी महापालिका आणि समाजकल्याण विभागाने संयुक्तपणे 22 खोके जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे गटई व्यवसायाच्या नावाखाली अन्य खोके थाटणार्यांचे अतिक्रमण काढण्यात आले.

झोन क्रमांक 1 अंतर्गत नवीन तहसील बिल्डींग ते पंचवटी चौक या मुख्य मार्गावर नागरिकांनी गटई स्टॉल, लोखंडी खोके, हॉटेल कँटीन, भाजीपाला स्टॉल, दुचाकी वाहन दुरुस्ती गॅरेज, मांस विक्री, पानटपरी असे दुकाने



थाटून, त्यावर सामाजिक न्याय विभाग असे लिहिलेले होते. काही ठिकाणी समाजकल्याणाचे निळ्या रंगाचे हे खोके बनावटी असल्याचे दिसून आले. या खोक्यांमुळे दररोज वाहतूक विस्कळीत होत होती. त्यामुळे गुरुवारी महापालिका व समाजकल्याण विभागाने संयुक्त कारवाई करून अतिक्रमण हटविले. महापालिका आयुक्त आणि उपायुक्तांच्या सूचनेवरून ही कारवाई करण्यात आली. गुरुवारी जे.सी.बी मशिनद्वारे ही कारवाई करण्यात आली. ज्यामध्ये 22 गटई स्टॉल्स जप्त करण्यात आले. वरील कारवाई समाजकल्याण विभागाचे प्रतिनिधी ऋषीकेश तायडे, अतिक्रमण हटाव पथक प्रमुख योगेश कोल्हे, श्याम चावरे, निरीक्षक अन्सार अहमद, शुभम पांडे, सासण विभागाचे भांडे, पोलीस कर्मचारी व अतिक्रमण विभागाचे कर्मचारी यांनी केली.

# अंजनगाव बाजार समिती अध्यक्षांच्या अपात्रतेचा आदेश रद्द

## ॲड. जयंत साबळे यांना दिलासा

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.6 )** – अंजनगाव सुर्जी कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष ॲड. जयंत गुणवंत साबळे यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या याचिकेच्या आधारे, जिल्हा उपनिबंधकांनी गेल्या वर्षी 22 जानेवारी रोजी महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती नियम 2017 च्या कलम 10 (3) अंतर्गत नोटीस बजावली होती. जयंत साबळे यांना अध्यक्षपदासाठी अपात्र घोषित करण्यात आले होते. जिल्हा उपनिबंधकांच्या या निर्णयाविरुद्ध ॲरड. जयंत गुणवंत साबळे यांनी विभागीय सह–निबंधकांकडे आव्हान दिले होते. सोमवार, 3 मार्च रोजी या अपीलावर सुनावणी झाल्यानंतर, विभागीय सह–निबंधकांनी मंडीचे अध्यक्ष औंड. जयंत साबळे यांच्या अपात्रतेचा आदेश रद्द करण्यात आला आहे.

अंजनगाव सुर्जी बाजार समितीमध्ये सहकार गटाकडे पूर्ण बहुमतासह पूर्ण सत्ता आहे, परंतु असे असूनही, विरोधी गटाकडून सहकार गटाला कोंडीत पकडण्यासाठी विविध तक्रारी केल्या जात आहेत. याअंतर्गत, जून 2024 मध्ये कृषी बाजार समितीचे माजी संचालक, अध्यक्ष ॲबड. जयंत साबळे महाराष्ट्र कृषी उत्पन्न (विकास आणि नियमन) कायदा, 1963 च्या महाराष्ट्र कृषी उत्पन्न (विकास आणि नियमन) निवडणूक नियम, 2017 च्या नियम 10 (3) नुसार त्यांना अपात्र घोषित करण्यासाठी साबळे यांनी जिल्हा उपनिबंधकांकडे याचिका दाखल केली होती. या प्रकरणाची सुनावणी झाल्यानंतर, 22 जानेवारी रोजी जिल्हा उपनिबंधकांनी अपात्रतेचा आदेश जारी केला. याला आव्हान देत, ॲसड. साबळे यांनी विभागीय सह–निबंधकांकडे याचिका दाखल केली तेव्हा 5 फेब्रुवारी रोजी अपात्रतेच्या आदेशावर अंतरिम स्थगिती आदेश प्राप्त झाला. ज्यावर विरोधी गटाने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल करून स्थगिती आदेश रद्द करण्याची मागणी केली. नंतर, उच्च न्यायालयाने 11 फेब्रुवारी रोजी एक आदेश जारी करून विभागीय सहनिबंधकांना 25 फेब्रुवारीपर्यंत प्रकरण निकाली काढण्याचे निर्देश दिले आणि आदेशाचे पालन न झाल्यास याचिकाकर्त्याला नवीन अपील दाखल करण्याची सुविधा दिली. परंतु याचिकाकर्ता प्रदीप गोमासे यांनी अपात्रता प्रकरणातील अंक क्रमांक 2, 3 आणि 4 वगळता सर्व मुद्द्यांना विभागीय सह–निबंधकांकडे आधीच आव्हान दिले होते. अशा परिस्थितीत, विभागीय सहनिबंधकांनी 27 फेब्रुवारी रोजी दोन्ही अपिलांवर सुनावणी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, 22 जानेवारी रोजी जिल्हा उपनिबंधकांनी जारी केलेला अपात्रतेचा आदेश रद्द केला. विभागीय सह–निबंधक प्रवीण फडणीस यांच्यासमोर झालेल्या सुनावणीत अध्यक्ष साबळे यांच्या वतीने ॲधड. सतीश गट्टाणी आणि बाजार समितीच्या वतीने ॲभड. विवेक काळे यांनी युक्तिवाद केला.



> बाजार समितीत झालेल्या पूर्वीच्या चोरीच्या घटनांचा तपास करण्याचे काम आम्ही सुरू केले होते. ज्यामध्ये विरोधकांनी अडथळा निर्माण करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. आमच्या संचालक मंडळाने कोणतेही गैरकृत्य केलेले नाही. त्यामुळे आम्हाला पूर्ण विश्वास होता की शेवटी सत्याचाच विजय होईल.
>
> **एड. जयंत साबळे**
> **अध्यक्ष,**
> **कृषी उत्पन्न बाजार समिती, अंजनगाव सुर्जी.**

# मेळघाटातील आदीवासी मजूरांची 'होळी' रंगहीन

## तीन महिन्यांपासून मजूरी न मिळाल्याने रंगाचा भंग



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि.6 )**– मेळघाटच्या धारणी व चिखलदरा तालुक्यातील जवळपास 60 हजार मजुरांचे 62 कोटींपेक्षा अधिक मजुरीची रक्कम न मिळाल्याने त्यांची होळी अंधारात जाण्याची भीती निर्माण झाले आहे. मेळघाट विधानसभा क्षेत्र हा आदिवासी बहुल भाग असून चिखलदरा व धारणी तालुक्यातील मजूर वर्ग महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून कामे करीत आहेत. परंतु मेळघाटमधील मजुरांची मजुरी ही मागील चार ते पाच महिन्यांपासून अद्यापपर्यंत मिळालेली नाही. मजुरांना उदरनिर्वाह करणे कठीण होऊन बसल्याने मेळघाटमधील मजुरांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत आहे.

### मुख्यमंत्र्यांना पाठविले पत्र

मागील तीन महिन्यांपासून मेळघाटातील आदिवासी मजुरांचे वेतन मिळाले नाही. वेतन मिळावे यासाठी आदिवासींनी ताला ठोको आंदोलन झाले. तरीसुद्धा प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले. आमसभेत लाडकी बहिणीच्या पैशाच्या भरवशावर घरदार चालत असल्याचे आदिवासी महिला सरपंचाने सांगितले. यावेळी तत्काळ मजुरांना त्यांचे वेतन देण्याची मागणी मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे. शासन निर्णयाप्रमाणे मजुरांना 15 दिवसांपर्यंत मजुरी मिळणे अपेक्षित असताना व आदिवासी बांधवांचा सर्वात मोठा मुख्य सण होळी असून मजुरी न मिळाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला आहे. तरी आपण 13 मार्च रोजी होणाऱ्या होळी सणापूर्वी रोहयोचे काम करणाऱ्या मजुरांचे पगार देण्याची मागणी आ. काळे यांनी केली आहे.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक –श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# 16 एकरात अमरावतीत साकारणारा आयटी पार्क

## खा. डॉ. अनिल बोंडे यांचे प्रयत्न ● औद्योगिक वसाहतीच्या विकासावर भर

### उद्योग मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 6 )** अमरावतीकर तरुणांच्या स्वप्नांना बळ देऊन माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात विकासाची नवी उंची गाठण्यासाठी अमरावतीत आयटी पार्क निर्माणाच्या हालचालींनी वेग घेतला आहे. 16 एकर परिसरात आयटी पार्कची निर्मिती होणार आहे. त्यासाठी काही भूखंडांची चाचपणीसुद्धा करण्यात आली आहे. त्यासाठी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी उद्योग मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या संदर्भातील संपूर्ण प्रशासकीय प्रक्रिया, जमीन अधिग्रहण पूर्ण करण्याचे निर्देश महसूल विभागाला दिले आहेत.

राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी (ता.5) जिल्हा प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीला उद्योग मंत्रालयाचे उपसंचालक शिरसाट, उद्योग विभागाचे महाव्यवस्थापक निलेश निकम, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विभागीय अधिकारी स्नेहा नंद, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, औद्योगिक वसाहत असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर यांच्यासह अन्य अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात नवी उंची गाठायची असेल तर अमरावतीत आयटी पार्क निर्माण होणे आवश्यक आहे. करिअरसाठी पुणे, मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या विदर्भातल्या तरुणाईला स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी पुढाकार घेतला आहे.

एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर यांनी या संदर्भातील बाबी पटवून दिल्या. त्या अनुषंगाने अमरावती येथे 16 एकर परिसरात माहिती तंत्रज्ञान पार्क विकसित केला जाणार आहे. नांदगावपेठ औद्योगिक वसाहत, सातूर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा औद्योगिक वसाहत या शहरालगतच्या जागांची यासाठी चाचपणी करण्यात आली. आयटी पार्कसाठी प्रस्तावित केलेल्या संभाव्य जागेचे अधिग्रहण महसूल विभागाने तातडीने करावे, अशा सूचना बैठकीत खासदार अनिल बोंडे यांनी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांना दिल्या.

जिथे पुणे, मुंबई, बंगलोर येथे जाणारे तरुण याच ठिकाणी सॉफ्टवेअर कंपन्या विकसित करू शकतील. स्थानिक स्तरावर चांगला रोजगार निर्माण होईल यासाठी हा पार्क महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.आयटी पार्क निर्माणासाठी आवश्यक असलेल्या संपूर्ण प्रक्रियेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे देखील आपण पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी म्हटले.

### आयटी पार्क, एआयचे युग

स्थानिक तरुण अभियंत्यांना रोजगारासाठी पुणे गाठावे लागते. इथे अभियंता घडतात मात्र नोकरीसाठी त्यांना दुसरीकडे जावं लागते. म्हणून शासनाकडे या संदर्भात पाठपुरावा होणे आवश्यक असल्याचे देखील अनिल बोंडे यांनी नमूद केले. बैठकीमध्ये शहर व जिल्ह्यातील औद्योगिक वसाहती विकसित करणे, उद्योजकांना पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध करून देणे, एमआयडीसीतील वळण मार्ग, पुरुषा विद्युतीकरणाच्या सोयी, दळणवळणासाठी आवश्यक असलेले रस्ते, उद्योगांना मुबलक पाणीपुरवठा करणे यासह विविध बाबींवर चर्चा करण्यात आली.

## मार्च ते नोव्हेंबर पर्यंत
# पृथ्वीवरुन दिसणार नाही ‘शनि’ ची सुप्रसिद्ध रिंग

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती - ( दि. 6 ).** आपल्या सूर्यमालेतील सर्वात सुंदर विलोभनीय कडी असणारा ग्रह म्हणजे शनि. त्यामुळे शनिचे वेगळेपण दिसून येते. परंतु ही सुप्रसिद्ध शनिची कडा मार्च ते नोव्हेंबरपर्यंत पृथ्वीवरुन दिसणार नाही. नोव्हेंबरनंतर शनिची रुबाबदार रिंग पृथ्वीवरुन पुन्हा पाहता येईल.



या आधी 2009 मध्ये अशी घटना घडली होती. सरासरी 15 वर्षानंतर ही परिस्थिती उद्भवते. शनि व पृथ्वी यांच्या सापेक्ष स्थितीवर कड्यांचे दृश्य अवलंबून असते. ज्यावेळी पृथ्वी शनिच्या विषुववृत्त पातळीत येते. त्यावेळी पृथ्वीवरुन शनिची कडी दिसत नाही. अशा वेळी शनिला एक अंधूक रेषा छेदित आहे,असा आपल्याला भास होतो. शनि अंश 2.5 अंशातून तर पृथ्वीचा अक्ष 23.5 अंशातून कललेला आहे. त्यामुळे एक वेळ अशी येते की, पृथ्वी सापेक्ष शनिचा अक्ष सुमारे 26 अंशातून कलतो. अशा वेळी कड्यांचे सुंदर दर्शन घडते. शनि हा पृथ्वीच्या प्रतलात येत असल्याने पृथ्वीवरुन शनिची रिंग दिसू शकत नाही. शनीला एकूण 82 चंद्र असून सर्वात मोठा चंद्र टायटन हा आहे. या ग्रहाला सूर्याभोवती एक चक्कर मारण्यास 29.5 वर्ष लागतात. या ग्रहाचा व्यास 1,20,000 की. मी. आहे. तापमान शून्याखाली 180 अंश सेंटीग्रेड आहे. या ग्रहाची घनता सर्वात कमी आहे. शनीची रिंग 2 लाख 70 हजार किमी. पर्यंत पसरलेली आहे. ही रिंग बर्फाची आहे. शनिचे वस्तूमान पृथ्वीच्या 95 पट आहे. पृथ्वी ज्या वेळी शनीच्या विषुववृत्त पातळीत असते. अशा वेळी शनीचे कडे पृथ्वीवरुन चांगल्या प्रकारे दिसू शकत नाही. शनीचा अभ्यास करणारे पहिले मानवरहित यान %कॅसिनी% हे आहे. व्हायेजर या मानवरहित यानांनी सुद्धा शनिचे जवळून छायाचित्र घेतले होते. 21 सप्टेंबर रोजी शनि हा पृथ्वीच्या जवळ येईल. परंतु रिंग हरवून बसलेला दुबळा शनि कसा दिसेल याची कल्पनाच न केलेली बरी. अशी माहिती मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रविण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय म. गिरुळकर यांनी दिली आहे. या घटनेविषयी अधिक माहिती पाहिजे असल्यास हौशी खगोल अभ्यासक, विजय म. गिरुळकर गुरुकृपा कॉलनी, वडाळी नाक्याजवळ, चांदूर रेल्वे रोड, अमरावती यांच्याशी खगोलप्रेमी अथवा विद्यार्थ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मुटकोर्ट स्पर्धेत डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे सुयश

## एकाच दिवशी विविध राष्ट्रीय स्पर्धेत विद्यार्थी चमकले



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी ( दि. 6 )** - राज्यभरात झालेल्या विविध राष्ट्रीय अभिरुप न्यायालय (मुटकोर्ट) स्पर्धेत डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाने उत्तुंग कामगिरी करत भरघोस बक्षिसे (दि.27) मिळवली. या यशामुळे राज्यात पुन्हा एकदा आपला नावलौकिक मिळविण्यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाला यश प्राप्त झाले आहे. नांदेड येथील नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय मूटकोर्ट स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. यात डॉ. पंजाबराव देशमुख महाविद्यालयाचा संघ सहभागी झाला होता. ज्यामध्ये ईश्वरी शिरभाते, अल्फिया सईद व श्रावणी निस्ताने या विद्यार्थिनींचा सहभाग होता. विद्यालयाच्या या चमूने उत्कृष्ट कामगिरी करत स्पर्धेत चे विजेतेपद व बेस्ट ॲडवोकेटची दोन पारितोषिके असे एकूण तीन बक्षिसे मिळविली. त्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे. यासोबतच ॲड एस. एस जाधवर विधी महाविद्यालय पुणे तर्फ राष्ट्रीय मुट कोर्ट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयातर्फे अक्सा मिर्झा, सदिच्छा कांबळे व प्रथमेश थोरात या विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्या चमूने उत्कृष्ट प्रदर्शन करत स्पर्धेचे उपविजेतेपद पटकाविले.

संदीप युनिव्हर्सिटी नाशिक द्वारा आयोजित मुट कोर्ट स्पर्धेमध्ये विद्यालयाच्या चमुने भाग घेऊन ऋषिकेश काळकर या विद्यार्थ्याने बेस्ट ॲडवोकेट हे पारितोषिक मिळविले. आदित्य उपाध्याय व प्रथमेश खोब्रागडे या विद्यार्थ्यांचा सुद्धा या संघामध्ये समावेश होता. यशाचे सर्वत्र कौतुक होत असून प्राचार्या डॉ. वर्षा देशमुख व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी चमूंचे व चमूंचे मार्गदर्शक डॉ. राजेश पाटील व ॲड वैभव इंगळे यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

# डॉ. सुदेश दार्व्हेकर यांनी केले राष्ट्रीय आपत्कालीन परिषदेत प्रतिनिधित्व


**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती ( दि. 6 ).** इमर्जन्सी मेडिसिन एज्युकेटर्स असोसिएशन (एईएमई) यांनी 19 फेब्रुवारी रोजी रामैय्या मेडिकल इन्स्टिट्यूट, बेंगळुरू येथे डीएनबी परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आपत्कालीन वैद्यकीय शिक्षणावर बोर्ड रिव्ह्यूचे आयोजन केले होते. डॉ. सुदेश दार्व्हेकर यांनी सहभाग घेतला होता.



या कार्यक्रमासाठी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील व्याख्याता डॉ. सुदेश दार्व्हेकर, सहायक प्राध्यापक, इमर्जन्सी मेडिसिन यांना %हायपरटेन्सिव्ह इमर्जन्सीज% विषयावर व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी या राष्ट्रीय परिषदेत पीडीएमएमसीचे प्रतिनिधित्व केले. अनोख्या या कार्यक्रमात एआयआयएमएस दिल्ली, पीजीआय आणि देशभरातील अनेक नामांकित संस्थांमधील तज्ञ वक्त्यांनी सहभाग घेतला. एईएमई नेत्यांच्या मुद्देसूद आणि प्रभावी सादरीकरणाचे कौतुक केले. डॉ. दार्व्हेकर यांच्या महत्त्वपूर्ण यशाबद्दल शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख तसेच अधिष्ठाता डॉ. ए. टी. देशमुख, इमर्जन्सी मेडिसिन विभागप्रमुख डॉ. पी. आर. सोमवंशी यांनी मार्गदर्शन तसेच अभिनंदन केले आहे.

# अरविंद राठोड यांची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या सहाय्यक संचालक पदावर नियुक्ती

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 6 )** महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या सहाय्यक संचालक पदासाठी झालेल्या सरळसेवा भरती प्रक्रियेत कारंजा लाड तालुक्यातील श्री अरविंद राठोड यांनी यश संपादन केले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्या पत्रान्वये शासनास त्यांच्या नावाची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार, महाराष्ट्र राज्याच्या कामगार विभागाच्या अधिपत्याखालील औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत त्यांची सहाय्यक संचालक पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्तीपत्राचा समारंभ दि. 3 मार्च 2025 रोजी महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री मा. आकाश फुंडकर यांच्या हस्ते श्री अरविंद राठोड यांना औपचारिक नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या प्रसंगी संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. यशाच्या मागील जिद्द आणि परिश्रम अरविंद राठोड यांनी कठोर मेहनत, चिकाटी आणि धैर्याच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्यांना मिळालेल्या या मोठ्या संधीबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला असून, आपल्या



यशाचे श्रेय त्यांनी आपल्या कुटुंबीयांना दिले आहे. त्यांनी विशेषत: आपल्या पत्नी योजना, आई वडील, मित्र परिवार आणि भावंडांचे मार्गदर्शन व पाठिंबा महत्त्वाचा ठरल्याचे सांगितले. पदस्थापना आणि पुढील जबाबदाऱ्या अरविंद राठोड यांची पदस्थापना पुणे-2 येथे करण्यात आली असून, ते लवकरच आपल्या नवीन जबाबदाऱ्या स्वीकारतील. औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्याच्या क्षेत्रात सकारात्मक योगदान देण्याच्या आपल्या उद्दिष्टांबद्दल त्यांनी आत्मविश्वास व्यक्त केला आहे.त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन केले जात असून, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# गाडगेबाबा विद्यामंदिरात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 6 )** श्री संत गाडगेबाबा माध्य. विद्यामंदिर महेंद्र कॉलनी येथे (दि.27) मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक आर.जी. पठाण तसेच प्रमुख अतिथी म्हणून वैशाली कारणकर यांची उपस्थिती होती. संचालन अनिता तंतरपाळे यांनी केले. मराठी शिक्षिकांना पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.यानंतर कुसुमाग्रज यांच्या काव्यावर वर्ग 8 वी मधुन आलिया शेख, महेक फिरदोस, वर्ग 9 वी मधून विद्या गौरकर, नयना मुंदाफळे या विद्यार्थ्यीनींनी कविता सादर केली. वर्ग 9 वी मधील डॉली टेंभरे, भाग्यश्री विंचुकर यांनी चारोळ्या आणि गुरुदेव उईके या विद्यार्थ्यांने मराठी भाषा गौरव दिनावर आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाकरिता शाळेतील सर्व विद्यार्थी तसेच शिक्षिका रोशनी ढेंगे व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# कौस्तुभ गाडगे राष्ट्रीय स्तरावर चमकला

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती ( दि. 6 )** - श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी कौस्तुभ गाडगे याने उत्तराखंड येथे झालेल्या 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत वाटरपोलो मध्ये द्वितीय स्थान पटकावल्याबद्धल महाविद्यालयाच्या वतीने त्याचा सत्कार (दि.28) करण्यात आला.

महाविद्यालयाच्या डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात प्राचार्य डॉ.अंबादास कुलट यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या समारंभाला श्री शिवाजी विज्ञान




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.व्ही.कोरपे, डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख, मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.स्मिता देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कौस्तुभ गाडगे याने 2024ङ्क25 मध्ये विविध स्पर्धांमध्ये सहभाग होत जालंधर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत त्याने अमरावती विद्यापीठाकडून प्रतिनिधीत्व केले.त्रिवेंद्रम येथे झालेल्या सिनियर नॅशनल चॅम्पियनशीपमध्ये त्याने तृतीय क्रमांक पटकावला तर 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत वाटरपोलो मध्ये द्वितीय स्थान पटकावले.या साठी त्याला महाराष्ट्र शासनाकडून सात लक्ष रुपये देण्यात येणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ.सुभाष गावंडे यांनी यावेळी दिली.

# महाराष्ट्र राज्यातच मराठी शाळा होतेय बेदखल

## अडीच हजार शाळा पट पटसंख्या अभावी बंद पडण्याच्या स्थितीत

### विदर्भात 800 हून अधिक शाळांचा समावेश

### ग्रामीण भागातील पालकांमध्ये चिंतेचे सावट

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती ( दि. 6 )** - एका बाजूला मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा आनंद आहे, तर दुसर्या बाजूला मराठी शाळांकडे विद्यार्थी फिरकत नसल्याने पालकच पाठ फिरवत असल्याने चिंतेचा विषय बनला आहे. राज्यात अडीच हजार शाळा पटसंख्ये अभावी बंद पडण्याच्या स्थितीत असल्याची धक्कादायक माहीती आहे.

विशेषत:, ग्रामीण भागात मुलांची संख्या कमी झाली आहे. तर शहरी भागात इंग्रजी माध्यमाकडे पालकांचा ओढा आहे. त्यामुळे ही परिस्थिती ओढवली आहे. कोकण विभागात 500, पश्चिम महाराष्ट्रात 700, मराठवाड्यात 400, उत्तर महाराष्ट्रात 300, तर विदर्भात 800 हून अधिक शाळांचा समावेश आहे.



विदर्भात जवळपास 986 शाळा या एक आकडी पटसंख्येच्या झाल्या आहेत. 10 पेक्षा कमी पटसंख्या झाल्याने या शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. प्रत्येक जिल्ह्यात सरासरी 150 ते 200 शाळा बंद पडण्याच्या स्थितीत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. एका बाजूला राज्यातील अडीच हजार शाळा पटसंख्येअभावी बंद पडण्याच्या स्थितीत आहेत. दुसर्या बाजूला मराठी शाळांमध्ये पटसंख्या वाढावी म्हणून सीबीएसईच्या धर्तीवर पहिलीपासून मराठी भाषा विषयाचा अभ्यास सुरू करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. एप्रिलऐवजी जूनपासून शैक्षणिक वर्ष सुरू केले जाणार आहे. सीबीएसई शाळांचा अभ्यासक्रम हा एप्रिलपासून सुरू होतो. मात्र, शिक्षकांनी लगेचच अभ्यासक्रम सुरू होणार नसल्याचे सांगितल्याने शैक्षणिक वर्ष हे आता जूनपासून सुरू करण्याचा निर्णय झाला आहे. मात्र, त्यामुळे तरी या शाळा तारणार का? याकडे लक्ष लागले आहे.

### मराठी शाळांची भयावह परिस्थिती

विदर्भातील 11 जिल्ह्यांतील जिल्हा परिषदेच्या 986 मराठी माध्यमाच्या शाळा या विद्यार्थी नसल्याने एक आकडी पटसंख्येच्या झाल्या आहेत. राज्यात हजारो मराठी शाळा (6,000 पेक्षा जास्त) एक आकडी पटसंख्येवर आल्या आहेत. म्हणजे पहिली ते चौथी या एकूण चार वर्गांत 10 पेक्षा कमी मराठी विद्यार्थीसंख्या आहे व दिवसेंदिवस अनेक मराठी शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या घटत आहे. दुसरीकडे, इंग्रजी माध्यमाच्या शाळा या भरगच्च दिसत आहेत. त्यामुळे मराठी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. मराठी भाषेवर मोठ्या प्रमाणात राजकारणही होताना दिसत आहे. मात्र, दुसरीकडे मराठी शाळा टिकविण्यासाठी किंवा त्या सुरू राहण्यासाठी कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाहीत.

### पालकांची इंग्रजीकडे कल

स्पर्धेच्या युगात वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि अन्य उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या प्रवेश परीक्षा इंग्रजीत असतात. भविष्यातील संधींमुळे मराठी पालक आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये घालण्यास प्राधान्य देत आहेत. ग्रामीण भागातसुद्धा इंग्रजी शाळांकडे ओढा वाढत आहे. स्पर्धेच्या युगात अनेक स्पर्धा परीक्षा, वैद्यकीय, अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा या इंग्रजीत घेतल्या जातात. त्यामुळे आमचा पाल्य हा त्यात टिकला पाहिजे म्हणून आपल्या पाल्यासाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळांना प्रवेश घेतलाय, असे अनेक विद्यार्थ्यांच्या पालकांनी स्पष्टच सांगितले.

# श्री क्षेत्र कोंडेश्वर पावन भुमी -ह.भ.प. गोडबोले महाराज

## काल्याचे कितर्न, महाप्रसाद ▌महाशिवरात्री महोत्सवाची सांगता

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी ( दि. 6 ).** जिल्ह्यातील प्रसिद्ध डोंगरांच्या पायथ्याशी वसलेले श्री क्षेत्र कोंडेश्वरांच्या वास्तव्याने पावन झालेली भुमी आहे. हे शिवालय अनेक साधू,संत व योगी पुरुषाने तत्पश्चर्येने पावन झालेली भुमी आहे. इतिहासात साक्ष देणारे 5 हजार वर्षांपासून पुरातन शिवालय, भगवान कोंडेश्वराच्या कृपेने काल्याचे कितर्न करण्याचे सौभाग्य मिळाले आहे,असे ह.भ.प.सोपान महाराज गोडबोले यांनी किर्तना सांगितले.



श्री क्षेत्र कोंडेश्वरांचा जिर्णोद्धार सुवर्ण जयंती महोत्सव ( दि.27) महाशिवरात्री निमित्त पार पडला. त्यात काल्याचे कितर्नात महाराज बोलत होते.

त्यात साथसंगत अनंत जोशी ,सुरेशपंत श्रीरामवार, विनायक ढोले यांनी दिली. हजारो महिला व पुरूषांच्या गर्दीने भव्य अशा महोत्सवाचे स्वरूप आले होते.

पुढे बोलतांना गोडबोले महाराज म्हणाले की,बडनेरा येथील सत्पुरूष वं. दादाशास्त्री भाडेकर यांनी आपल्या प्रेरणा व परिश्रमातून 1975 वर्षी वसंत पंचमीच्या मुहुर्तावर जीर्णोध्दार समिती स्थापन करुन संस्थानच्या विकासाची मुहूर्तावेळ रोहली. त्यानी त्यामध्ये कुठलाही भेदभाव न करता एका महान कार्याला सुरुवात केली. आज या गोष्टीला 50 वर्षे पूर्ण झाले. संस्थानच्या विकासात दिवसेंदिवस झालेली प्रगती पाहता आतापर्यंत झालेल्या संस्थानच्या विश्वस्त मंडळीने मोलाचे योगदान दिले. पाचशे वर्षांपासून पिढ्यांपिढया आमचे गोडबोले कुटुंब या अखंड यज्ञात श्री भगवान कोंडेश्वराच्या कृपेने कार्य करत आहे. किर्तनाच्या माध्यमातून आपली सेवा देत आहे. ही सेवा आम्हाला मिळाली हे आमचे भाग्य असुन श्री कोंडेश्वर भगवान त्यासाठी आम्हाला सदैव बळ देओ, असे गौरवोद्गार महाराजांनी काढले.

यावेळी संस्थानचे अध्यक्ष व समस्त विश्वस्त मंडळ उपस्थित होते. त्यानंतर काल्याच्या किर्तनाच्या समाप्तीनंतर लगेचच महाप्रसादाला सुरूवात करण्यात आली.यामध्ये विविध सेवाधारी , गजानन महाराज महिला मंडळ, भजनी मंडळींनी आपली सेवा दिली. श्री क्षेत्र कोंडेश्वर महाशिवरात्री महोत्सवाची काल्याचे कितर्न व भव्य महाप्रसादाने सांगता करण्यात आली.

# गंजी पेटली, मात्र थोडक्यात वाचले लवादा!

### अग्निशमण दलाच्या वाहनाला झाला उशिरा

### ग्रामस्थांमूळे टळली अप्रिय घटना





**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी( दि.6 )-** कडक उन्हाळा सुरू झाल्याने मेळघाटातील विविध भागात आगीच्या घटना लागत असल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. धारणी सोलर प्रोजेक्टसह चार्कदा गावात लागलेल्या आगीच्या घटनेच्या बातमीची शाई सोकते न सोकते तेच आता चिखलदरा तालुक्यातील लवादा गावात आज 6 मार्च रोजी दुपारी तीन दरम्यान गवताच्या गंजीला भीषण आग लागून मोठे नुकसान झाले. चिखलदरा नगर परिषदेचे वाहन 30 मिनिटे उशिरा आल्याने गावकऱ्यांनी आपआपल्या घरात साठविलेले पाणी आणून आगीवर नियंत्रण मिळविले. अन्यथा अर्ध्या पेक्षा जास्त गावातील घरे आगीच्या विळख्यात आले असते.

लवादा गावातील दत्तुजी रामजी येवले (55) हे आज दुपारी 3 वाजताच्या सुमारास त्यांच्या घरातील पाळीव पशूंसाठी गावालगतच्या शिवारात चारा आणण्यासाठी गेले होते. अशातच अचानक त्यांच्या गुरांसाठी साठवलेल्या वैरणाला आग लागल्याने गावात एकच खळबळ उडाली. याबाबत कळताच दत्तुजी येवले तातडीने घरी धावत आले. गावातील काही लोकांनी चिखलदरा अग्निशमण विभागाला माहिती दिली. परंतु, बराच वेळ होऊनही अग्निशमणचे वाहन न आल्याने गावकऱ्यांनी आपआपल्या घरात लहान-मोठया भांड्यांमध्ये साचविलेले पाणी आणून आगीवर पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. अन्यथा कडक उन्हामुळे आग पसरली असता गावातील अर्ध्यापेक्षा जास्त घरे आगीच्या विळख्यात येऊन मोठया प्रमाणात वित्त व जिविताची, प्राण्याच्या जिवाची हानी झाली असती. या आगीत दत्तुजी येवलेंचे सुमारे 30 ते 40 हजाराचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. दरम्यान अग्निशमण दलाच्या वाहनाने घटनास्थळी येऊन आगीवर पाण्याचा मारा केला. दत्तुजी येवले यांच्या घरावरून विजेचा तार गेला असल्याने शॉक सर्कीट होऊन आगीचा गोळा खाली पडल्याने ही आग लागली असल्याचे समजते. याबाबत कळताच चिखलदराचे तहसिलदार जीवन मोराणकर यांनी तत्काळ संबधीत पटवारीला दत्तुजी येवले यांच्या घरी लागलेल्या आगीचा पंचनामा करण्याचे आदेश दिले. तर दुसरीकडे गावकऱ्यानी उन्हाळा सुरू झाला असल्याने आगीवर तात्काळ नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निशमणच्या वाहन चालकाचे रिक्त असलेल्या पदावर तत्काळ चालकाची नियुक्ती करण्याची मागणी नपं मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.

### सेवानिवृत्त चालक आला कामी

चिखलदरा नपने अग्निशमणचे वाहन चालविण्यासाठी एका खाजगी चालकाला डेलिविजेसवर ठेवलेले आहे. आत तो चालक काही कामानिमित्त बाहेरगावी गेला असल्याने लवादा गावात आगीची माहिती आल्यानंतर अग्निशमण विभागाकडे वाहनाचा चालकच नव्हता. अखेर चिखलदरा न.प.मधून सेवानिवृत्त झालेले मुन्ना इंदुकर यांनी तत्परता दाखवून अग्निशमणचे वाहन लवादा गावात नेले. दोन वर्षाआधी सुध्दा लावादा गावात मोठया प्रमाणात अग्नितांडव झाला होता. तेव्हा देखील चिखलदरा अग्निशमणचे वाहन घटनास्थळावर उशिरा आले होते.

### तलाठयांकडून पंचनामा

तलाठी चतुर जाऊन पंचनामा केला तसेच चिखलदराचे पोलीस स्टेशनचे पीएसआय सुरेश राठोड यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला.

# मेळघाटात शिवसेना उबाठा पक्षाचे पदाधिकारी जाहिर

### जिल्हा प्रमुखांनी केल्या नियुक्त्या

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.6 )** - शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील नवीन पदाधिकाऱ्यांच्या नावांची घोषणा नूकतीच करण्यात आली आहे. अमरावती जिल्ह्यातील अन्य तालुक्यांतील पदाधिकारी जाहिर करण्यात आले आहे. आता मेळघाटातील पदाधिकाऱ्यांच्याही जिल्हा प्रमुखांनी नियुक्त्या केल्या आहेत.

धारणी तालुका ग्रामीण शहर पदाधिकाऱ्यांमध्ये उपतालुका प्रमुख अशोक वसु, समन्वयक रतिलाल सानु पटोरकर, जिल्हा परिषद गटानुसार विभाग प्रमुख शे. इकबाल शे. इस्माल (कुटंगा), घनश्याम प्रेमचंद राठोड (दिया), भागिरथ गुरवेकर (गोंडवाडी), बिसराम दादु भिलावेकर (मोर्गदा), नारायण माकोडे (सावलीखेडा), पंचायत समिती धारणी गणानुसार उपविभाग प्रमुख अनिल गिरी (दुनी), रविराज साहेबलाल कासदेकर (दिया), दुर्गा प्रसाद जयस्वाल (शिरपूर), काल्या मुळचंद भिलावेकर (मोगरदा), श्रीराम उर्फ नाटु सावरकर (सावलीखेडा), दत्ता नागरगुजे (राणीगाव), लक्ष्मण दारशिंबे, सिकंदर पठाण यांची निवड करण्यात आली आहे. धारणी शहराचे उपप्रमुख म्हणून शे. तोशीफ शे. मतीन आणि राजकुमार प्रल्हाद मोहोड यांची निवड झाली. अजय राठोड, मनिष सरागे, सुरेश राठोड, मयुर गजानन बनसोड, राजेश मुन्डोकार, करण हिरालाल जावरकर, पंजाबराव खंडारे, गौतम गिरी, भुरेलाल जावरकर, राजेन्द्र बुडा पटेल यांची विविध प्रभागांच्या प्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. चिखलदरा तालुका उपप्रमुख म्हणून शिवराज मंगल गोरले आणि तुमला पुय्या कासदेकर, साहेबराव बाबुलाल वाघमारे, विठ्ठल हेगडे यांची निवड करण्यात आली असून त्यांना विभागनिहाय जबाबदारी देण्यात आली आहे. पंचायत समिती गणानुसार उपविभाग प्रमुख म्हणून मंगेश जामुनकर (हतरू), मनिष बेडेकर (चुरणी), भोगेलाल मुंगिलाल बेठेकर (काटकुंभ), सुमारे मावसकर (सलोना), भुऱ्या चिमोटे (चिखली), रामदास मानु झामरकर (खटकाली), रामप्रसाद मोतीलाल शेलेकर (तेलखार), विजेन्द्र बेलसरे (टेंम्बुसोंडा) यांची तर चिखलदरा शहर संघटकपदी सागर चौधरी, उप शहरप्रमुखपदी गणेश रणबावले, मयुर गवई, प्रभाग प्रमुख पदी राहीला शहा, शुभम देवकर, गणेश पाटील, मुजफ्फर शेख, नंथ्थु खडके, प्रविण धुर्वे, उपविभाग प्रमुख फैजान शेख, ऋषिकेश डोंगरे, अनिल चावंडे, प्रशांत कंदिलवार, शशांक येवले, मोहन येवले, मुस्तकिम शेख, शे. नतिन, रामदास शनवारे, अविनाश बरघट, प्रज्वल येवले, कार्तिक येवले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चांदूरबाजार तालुक्याचे संघटक म्हणून सुरेश काकडे, समन्वयक म्हणून राजेश अग्रवाल, अचलपूर विभाग प्रमुखपदी जय शेषराव कोथळकर, पंकज उमक, महेंद्र टाके, प्रफुल धुळधर, किशोर हिरुळकर, राजाभाऊ तायडे, उमेश काळे, वतन नितनवरे यांना विविध विभागांच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत.

# डेटा खरेदीच्या नावाखाली 3.11 लाखांची फसवणूक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 6 )** - ऑनलाइन डेटा खरेदी करून लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली परतवाडा येथे राहणाऱ्या 27 वर्षीय तरुणीजवळील 3 लाख 11 हजार रुपये उकळल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना 24 ऑक्टोबर 2024 ते 29 ऑक्टोबर 2024 दरम्यान घडली. याप्रकरणी हर्षा धन्नू पंधरे यांच्या फिर्यादीवरून परतवाडा पोलिसांनी अज्ञात मोबाईलधारकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

परतवाडा स्थित गणेश नगर येथील रहिवासी हर्षा पंधरे यांना 27 ऑक्टोबर 2024 ते 29 ऑक्टोबर 2024 दरम्यान विविध मोबाईल क्रमांकांवर कॉल आले. ज्यामध्ये फसवणूक करणाऱ्यांनी ऑनलाइन डेटा खरेदी करून लाभ मिळवून देण्याचे आश्वासन दिले. फसवणूक करणाऱ्यांच्या सूचनेनुसार त्यांनी विविध यूपीआय आयडीवर एकूण 3 लाख 11 हजार 105 रुपये ऑनलाइन ट्रान्सफर केले. मात्र त्यानंतर आरोपींनी कोणतेही उत्तर दिले नाही. अज्ञातांनी तरुणीची 3.11 लाख रुपयांची फसवणूक केली. ज्याची फिर्याद तरुणीने परतवाडा पोलीस ठाण्यात दिली आहे. पोलिसांनी अज्ञात मोबाइलधारकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# डिगरगव्हाण येथे शनिवारी आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर

- रविराज देशमुख मित्र परिवाराचे आयोजन
- संत दामोदर महाराज प्रगटदिनाचे औचित्य



**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा, ( दि. 6 )** स्वस्थ व निरोगी आयुष्यासाठी अनेक लाभदायी योजना मोदी सरकार तर्फे देशात राबविण्यात येत आहे. याच अनुषंगाने भाजपचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हिम्मत फाऊंडेशन, शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नागपूर आणि जीवन आधार बहुद्देशीय सामाजिक संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने शनीवार, 08 मार्च रोजी तिवसा तालुक्यातील श्री क्षेत्र डिगरगव्हाण ता. येथे निशुल्क महाआरोग्य रोगनिदान व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

य शिबीरामध्ये मेडिसिन, स्त्रीरोग, अस्थिरोग, नेत्ररोग, बालरोग, दंतरोग, न्यूरोलॉजी, शल्यचिकित्सक, नाक-कान-घसा, मेंदू शस्त्रक्रिया (न्यूरो सर्जन), किडनी रोग, हृदय रोग अशा विविध रोगावरील तपासणी तब्बल 70 तज्ज्ञ डॉक्टरांची टीम करणार आहे. औषधांचे मोफत वितरण यावेळी करण्यात येणार आहे. तसेच शिबीर स्थळावरून रुग्णालयात जाण्याकरिता वाहनांची सुद्धा मोफत सुविधा देण्यात आली आहे.

आतापर्यंत तिवसा मतदार संघ तसेच आजूबाजूच्या अनेक गावातील हजारो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला असून त्यांची मोफत शस्त्रक्रिया सुद्धा करण्यात आली आहे. डॉक्टरांच्या सल्ल्याने ज्या रुग्णांना अधिक तपासण्या करणे आवश्यक आहे. त्या सर्व तपासण्या सुद्धा चांगल्या हॉस्पिटलमध्ये करण्याची जबाबदारी रविराज देशमुख मित्र परिवाराच्या वतीने घेण्यात आली आहे. तसेच रक्तदान करणा?या रक्तदात्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र तसेच भेटवस्तू सुद्धा वितरित करण्यात येणार आहे. त्यामुळे डिगरगव्हाण गावातील तसेच परिसरातील सर्व नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रविराज देशमुख यांनी केले आहे.

# महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणाऱ्याचा सत्कार



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.6 )** - मेळघाटात आदिवासी महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणार्या व्यक्तींचा सत्कार नूकताच मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. चिखलदरा येथील सिपना लोकसंचालीत साधन केंद्रात वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. त्यावेळी हा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला चिखलदरा पंचायत समितीचे उपविभागीय अधिकारी महेश वढई, संरक्षण अधिकारी राठोड, जिल्हा समन्वय अधिकारी सुनील सोसे, लेखाधिकारी प्रकाश टाके, प्रणिता कराळे, सागर पाचाळे, उप व्यवस्थापक सुनील धिकार, ग्रा.पं. शहापूर उपसरपंच बाबू हेकडे तसेच सिपना सीएमआरसीच्रूा अध्यक्ष उर्मिला बेलसरे, सचिव सुग्रती मेटकर, हेमंत अलोकार, उपजीविका सल्लागार दिनेश घुमावरे, लेखापाल राम येवले, सहयोगिनी वंदना गुडधे, कोमल नवले व माधुरी पैठणकर तसेच बचत गटांतील महिला व पुरुष उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिपना सीएमआरसीचे व्यवस्थापक हेमंत अलोकार यांनी केले. कार्यक्रमाचा मुळ उद्देश म्हणजे गाव स्तरावर महिला सक्षमीकरणाकरीता पूरक वातावरण तयार होणे, घर दोघांचे अभियान राबवणे, घरावर पती पत्नीच्या नावाची पाटी लावणे, महिलांना सन्मानपूर्वक वागणूक देणे असा असल्याचे त्यांनी सांगितले. सुधारक सन्मान सोहळ्यांतर्गत 24 गावातील पुरुषांना सन्मानित करण्यात आले.

### हरताळा येथे मुख्यमंत्री युवा कौशल्य प्रशिक्षणार्थ्यांना निरोप

**महासागर प्रतिनिधी**

**हरताळा, ( दि. 6 )** येथील जिल्हा परिषद शाळेत मुख्यमंत्री युवा कौशल्य प्रशिक्षण योजनेंतर्गत सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण करणाऱ्या जगदीश सनके यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा रेखा चांदणे, पालक प्रतिनिधी छाया दाहेदार, शाळेतील शिक्षक वृंद आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या वतीने जगदीश सनके यांना भेटवस्तू देऊन निरोप देण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक आनंद मांडवेकर, संगीता भेटले, वर्षा लाहोटी, आदेश तांबे, शीला वाडेकर, सुनीता दुर्गे यांनी आपले विचार व्यक्त केले.

# टवलारमध्ये वीजचोरी प्रकरणी महावितरणची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर ( दि. 6 )** - महावितरणच्या सीटी-1 उपविभागाअंतर्गत येणाऱ्या परसापूर उपकेंद्राच्या टवलार गावात वीजचोरीच्या प्रकरणांवर कठोर कारवाई करण्यात आली. महावितरण परसापूर कार्यालयाच्या पथकाने छापा टाकत हुक टाकून वीजचोरी करणे, मीटर बायपास करणे आणि मीटरमध्ये छेडछाड करणाऱ्या पाच जणांविरुद्ध कठोर कारवाई केली.ही कारवाई उपकार्यकारी अभियंता मनोज टवळारकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत सहायक अभियंता निलेश रोटे, निलेश शेवाने, राजेश बुराडे, मुकुंद काटोले, पवन वडुळकर, सुशांत नळकांडे, राहुल मानकर, कीशोर सरदार, निलेश घरत, मंगेश रामेकर आणि समीर खान यांच्या पथकाचा सहभाग होता.

### वीजचोरीवर महावितरणचा कठोर दृष्टिकोन

महावितरण अधिकाऱ्यांनी सांगितले की, वीजचोरीमुळे विभागाला मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागतो आणि हे बेकायदेशीर कृत्य सर्वसामान्य नागरिकांसाठीही धोकादायक ठरू शकते. वीजचोरी रोखण्यासाठी महावितरणकडून सातत्याने छापेमारी केली जात आहे आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

### भविष्यात आणखी कठोर कारवाई होणार

महावितरण विभागाने गाव आणि शहरांमध्ये वीजचोरी रोखण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली आहे. अशा प्रकारच्या घटनांमध्ये सामील असणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र विद्युत अधिनियम अंतर्गत कठोर कारवाई केली जाणार आहे. अधिकाऱ्यांनी जनतेला आवाहन केले आहे की, वीजचोरी टाळावी आणि कुठेही अशा गैरकृत्याची माहिती मिळाल्यास तत्काळ महावितरणला कळवावे.

# शेणाच्या चाकोल्या होळीतुन झाल्या हद्दपार

### चाकोल्या कुणी बनवेना





**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.6 )** - होळी आणि धुळवडीचे जसे रंगांशी नाते आहे, तसेच नाते शेणाच्या चाकोल्यांशीही आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत व सध्या चाळीशी पार केलेली पिढी होळी जवळ आली की घरोघरी शेणाच्या चाकोल्या बनवत असे, आता मात्र या चाकोल्या इतिहासजमा झाल्या आहेत. सध्याच्या नव्या पिढीला हा प्रकारही फारसा माहीत नाही.

फाल्गुन पौर्णिमेला हा लोकोत्सव साजरा होतो. महाराष्ट्रात होळीच्या दिवशी समिधा म्हणून काही लाकडे मंत्रोच्चारात जाळण्यात येतात आणि पेटलेल्या होळीभोवती 'बोंबा' मारत लोक प्रदक्षिणा घालतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी वसंतोत्सवाचा प्रारंभ होतो. यात वाळलेली पाने आणि लाकडे एकत्र करून जाळणे हाच होळीचा उद्देश आहे. होळी म्हणजे लाकडे पेटवणे आणि दुसऱ्या दिवशी रंग खेळणे. पुर्वी घरोघरी होळी पेटायची आता बहुतांश ठिकाणी एकच होळी पेटविली जाते. होळी लाकडांची असली तरी घरोघरी तयार केलेल्या शेणाच्या चाकोल्या होळीत पूजेच्यावेळी टाकल्या जायच्या. होळीच्या साधारण पंधरा-वीस दिवस आधी चाकोल्यांसाठी घरातील लहान मुले शेण गोळा करायची. ज्यांच्याकडे घरीच गुरे असायची त्यांना शेणाचा प्रश्न नव्हता. पण, ज्यांच्याकडे गुरे नसायची ते रस्त्याने बादली घेऊन शेणाच्या शोधात निघायचे. अर्थात शेण सापडणे काही कठीण नव्हते.

### रेडीमेट चाकोल्या विक्रीला



या वर्षी होळीचा सण 13 मार्च रोजी साजरा केला जाईल. त्यासाठी ग्रामीण भागात व्यावसायिक स्तरावर पारंपारिक चाकोली चे उत्पादन सुरू झाले आहे. ग्रामीण भागात बनवलेल्या या पारंपारिक आणि आकर्षक तयार चाकोल्यांना शहरात मोठी मागणी आहे. शहरात हे माळा 30 रुपये आणि उघड्या चकली 20 रुपये डझन दराने विकले जात आहेत. या व्यवसायाने सणासुदीच्या काळात नवीन रोजगारही उपलब्ध करून दिला आहे.

### मोबाइलने केली परंपरा गिळंकृत

तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल फोनच्या त्या मंजूळ घंटीने आणी मोबाईल स्क्रीनच्या चकचकीत चेहऱ्याने आपल्याला अशी काही भुरळ घातली आहे की लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच त्यात गुंतून गेलेले आहेत. तसा पाहिला तर रंग खेळण्यासाठी मिळणार म्हणून होळी हा लहानग्यांचा आवडता सण. त्यातही मोबाईल मध्येच तासनतास डोक खुपसून बसलेल्या चिमुकल्यांना कुठे सवड आणि आवड रंग खेळण्याची व होळीकरीता शेणापासून वेगवेगळ्या प्रकारच्या चाकोल्या बनवायची पण याही काळात काही पालक या प्रथा परंपरांना जोपासत आपली संस्कृती टिकवण्यासाठी धडपडत आहेत. आज चिमुकल्यांना कुठे मातीचा स्पर्श सुद्धा होत नाही, तिथे काही चिमुकली शेण मातीत खेळून चाकोल्या बनवितात तेव्हा मोबाईल मध्ये हरवलेले बालपण जेव्हा शिंगोळ्यामध्ये रमून आपल्या उत्सवांना पारंपरिक पद्धतीनेच साजरे करुया असा सामाजिक संदेश ते यामधून देत आहे.

### विविध आकाराच्या चाकोल्या साकारल्या जायच्या

तेव्हा भरपूर शेण जमा व्हायचे. मग घरासमोरच्या अंगणात बसून या शेणाच्या वेगवेगळ्या आकाराच्या चाकोल्या केल्या जायच्या. दिवाळीतील चकल्यांसारखा गोल आकार म्हणन त्या चाकोल्या. गोल, बदाम, त्रिकोणी, नारळ, कुर्त्याचे कान, सुर्य, चंद्र, निंबू, सुप इत्यादी मोठ्या उत्साहाने विविध आकाराच्या चाकोल्या केल्या जायच्या. या चाकोल्यांना मध्यभागी मोठे छिद्र केले जायचे. होळी येईपर्यंत या चाकोल्या खणखणीत वाळलेल्या असायच्या. मग नारळाच्या दोरीत त्या या चाकोल्या ओवून त्याची माळ यार करायची. एका माळेत साधारण 20-25 चाकोल्या असायच्या. या चाकोल्यांच्या माळा होळीत टाकल्या जात. शहरात तर सोडा गावगाड्यातही आता चाकोल्या दिसत नाही पण काही उत्साहींनी ही परंपरा टिकवून ठेवली आहे. शेणात हात भरविण्याची आणि शेणापासून चाकोल्या करण्याचा जो आनंद मिळतो त्याची किंमत नव्या पिढीला कळणे कठीण आहे.

# मेळघाटातील आदिवासी युवकाची परदेशात गगनभरारी

### अमेरिकेत करतोय संशोधन, प्रशासनाकडूनही कौतूक



डॉ. नितेश ने आदिवासी आश्रम शाळेच्या जोरावर परदेशात गगनभरारी घेतली आहे. मेळघाटातील विद्यार्थी शिक्षणात अतिशय सरस आहेत. आश्रम शाळेतुन अनेक आदिवासी विद्यार्थांनी आपले भविष्य उज्ज्वल केले आहे.

**प्रियंवदा म्हाडदळकर,**
**प्रकल्प अधिकारी,**
**एकात्मिक आदिवासी विकास विभाग, धारणी**

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी ( दि. 6 )** - मेळघाटातील लवादा येथील स्व.चुन्नीलाल पटेल आदिवासी आश्रम शाळेतील डॉ. नितेशलाल कासदेकर या आदिवासी विद्यार्थाने अमेरिकेत गगनभरारी (दि.7) घेतली आहे. घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असतांना शिक्षणासाठी अनेक अडीअडचणींना तोंड त्याने अमेरिकेत जिल्ह्यासह मेळघाटचे नाव मोठे केले आहे. सध्या नितेश अमेरिकेत 40 लाखाचे पॅकेज घेऊन संशोधन करीत आहेत.

चटवाबोड येथील डॉ. नितेशलाल कासदेकर असे या ध्येय वेळा विद्यार्थाचे नाव आहे. निलेश अमेरिकेत मध्ये शिक्षणासाठी दाखल झाले. अमेरिकेतील जॉर्जिया विद्यापिठात फार्मास्युटिकल बॉयो मेडिकल सायन्स मध्ये त्यांनी संशोधन सुरू केले आहे. त्यापुर्वी नितेश ने पुणे येथील विद्यापिठातुन मास्टर ऑफ सायन्स केमिस्ट्री पदवी प्राप्त केली आहे.

नितेशचे प्राथमिक शिक्षण चटवाबोड जिल्हा परिषद शाळेत झाले. त्यानंतर डॉ. नितेश यांनी लवादा येथील आश्रम शाळेतून 81.09 टक्के गुण मिळवून दहावी उत्तीर्ण केली. तेथून त्यांनी धारणी जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश मिळविला आणि आदिवासी वसतीगृहात राहून 12 वी विज्ञान शाखेतुन उत्तीर्ण झाले. त्या नंतर ते पुढील शिक्षण त्यांनी अमरावती येथील शिवाजी महाविद्यालयात विज्ञान शाखेत घेतले. घरी आर्थिक स्थिती हलाकीची असल्यामुळे नितेश ला आदिवासी आश्रम शाळेत प्रवेश घ्यावा लागला. लवादा येथे शिक्षण घेत असतांना आश्रम शाळेचे मुख्याध्यापक दिनेश आगरकर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केल्यामुळे आज मी अमेरिकेत पोहचलो असल्याचे नितेश ने सांगितले. नितेशच्या घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्यांना पुढील शिक्षणासाठी अनेक अडीअडचणींना तोंड द्यावे लागत होते. सध्या नितेश अमेरिकेत 40 लाखाचे पॅकेज घेऊन संशोधन करीत आहेत.

# अस्मिता

# पाणी खरेच शुद्ध आहे?

दुषित पाण्याने होणाऱ्या आजाराची (जीबीएस)दहशत वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर शुद्ध आणि स्वच्छ पाणी मिळणे हे एक आव्हान बनत आहे. स्वच्छ पाणी मिळवण्यासाठी सध्या अनेक घरांमध्ये रिव्हर्स ऑस्मोसिस (आरओ) सिस्टीम बसवलेल्या आढळतील. मात्र आरओ बसवण्यासोबतच पाण्याच्या गुणवत्तेसाठी त्यात विरघळलेल्या घन पदार्थांची म्हणजेच टीडीएसची माहिती घेणेदेखील महत्त्वाचे असते हे लक्षात घ्या कारण यातील असंतुलनामुळे पाणी आरोग्यासाठी  हानिकारक ठरु शकते. पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी ही टीडीएस चाचणी केली जाते. तेव्हा उन्हाळा सुरू होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ती अवश्य करुन घ्या.



# ऋतूबदल होतोय, स्वास्थ्य जपा

बदलत्या ऋतूंचा आपल्या शरीरावर आणि मनावर खोलवर परिणाम होतो. हिवाळ्यापासून उन्हाळ्याकडे जाताना शरीराला नवीन ऋतूशी जुळवून घेण्यासाठी योग हा एक उत्तम पर्याय आहे. योगासनांमुळे केवळ शारीरिक आरोग्यच चांगले राहत नाही तर मानसिक संतुलन सुधारते आणि उर्जेची पातळीदेखील वाढते. तेव्हा हंगामी संसर्ग टाळण्यासाठी तसेच निरोगी राहण्यासाठी रोगप्रतिकारक शक्तीचे वर्धन करण्यास साह्यभूत ठरणारी योगासने नेमाने करु या.

* सूर्य नमस्कार

सूर्यनमस्कार शरीरात उष्णता टिकवून ठेवतात आणि उर्जेची पातळी देखील वाढवतात. हे १२ आसनांचे चक्र शरीराच्या सर्व भागांना सक्रिय करते. सूर्यनमस्कार केल्याने रक्ताभिसरण सुधारते, पचनसंस्था मजबूत होते आणि शरीर लवचिक बनते. याशिवाय तणाव कमी करण्यास तसेच मन शांत करण्यास देखील ते मदत करते.

* भुजंगासन

भुजंगासन छाती आणि फुफ्फुसांना मोकळे करण्यास मदत करते. हिवाळ्यानंतर उन्हाळ्यात प्रवेश करताना ते विशेषतः फायदेशीर ठरते. हे आसन पाठीचा कणा मजबूत करते तसेच पोटाच्या अवयवांना सक्रिय करते. भुजंगासन नियमितपणे केल्याने श्वसनसंस्था मजबूत होते आणि शरीरातील ऊर्जा देखील वाढते.


* वृक्षासन

संतुलन आणि लक्ष केंद्रित करण्यासाठी वृक्षासन सर्वोत्तम आहे. हे आसन पाय आणि घोटे मजबूत करते आणि मन शांत ठेवते. हवामान बदलावेळी शरीर स्थिर ठेवण्यासाठी आणि मानसिक स्थिरता प्राप्त करण्यासाठी हे आसन खूप फायदेशीर आहे. खेरीज हे आसन शरीराचे संतुलन राखण्यासही मदत करते.


* त्रिकोणासन

त्रिकोणासन शरीराच्या सगळ्या बाजू मोकळ्या करते आणि पाठीचा कणा लवचिक बनवते. या आसनामुळे पचनसंस्था सुधारते तसेच शरीरातील विषारी घटक बाहेर काढण्यास मदत होते. याशिवाय हे आसन पाय, कंबर आणि खांदे मजबूत करते. नियमितपणे हे आसन केल्यास रक्ताभिसरण सुधारते.







# पारुल चावला यांचा पदरव

अलिकडेच  पीआर आणि मार्केटिंग उद्योगातील सर्वात प्रसिद्ध नावांपैकी एक असणाऱ्या पारुल चावला यांना 'मिफ'मध्ये मीडिया समुदायाने सन्मानित केले. हा एक महत्त्वपूर्ण क्षण आपण अनुभवला. कथांना आकार देण्यात तसेच विविध ब्रँड्सचे नाव उंचावण्यात दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल पारुल यांना या सन्मानाने गौरविण्यात आले. बॉलीवूड स्टार विकी कौशल आणि शिल्पा शेट्टी यांनी त्यांचा सन्मान केला. आज आपण पारुल चावला या मानिनीच्या कामाची माहिती घेऊ या.

पारुल चावला यांनी अग्रगण्य धोरणांनी आणि अतुलनीय कौशल्याने माध्यम जगात क्रांती घडवून आणली आहे. त्यांची कंपनी 'पिक्चर एन क्राफ्ट' ने असंख्य चित्रपट, संगीत लेबल्स आणि व्हिडिओ, चित्रपट कलाकार, कॉर्पोरेट्स, फॅशन हाऊसेस आणि डिझायनर्स, स्पर्धा, कार्यक्रम, टेलिव्हिजन शो, राजकीय व्यक्तिमत्त्वे, रिअल इस्टेट प्रकल्प तसेच इतर संस्था आणि वैयक्तिक प्रतिभांसाठी डिजिटल मोहिमांना यशस्वीरित्या प्रोत्साहन दिले असून त्यासाठी सुयोग्य नीती आखण्याचे काम केले आहे. थोडक्यात या सगळ्यांना नवी ओळख मिळवून देण्यात त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. अनेक पुरस्कारांवर आपले नाव कोरलेल्या पारुल चावलाच्या प्रभावी पुरस्कारांच्या यादीत सरस्वतीबाई दादासाहेब फाळके नारी शक्ती सन्मान पुरस्कार, सर्वोत्तम जनसंपर्क, सर्वोत्कृष्ट जनसंपर्क आणि विपणन फर्म, वॉव मीडिया, इव्हेंट्स अँड पब्लिक रिलेशन्स पर्सन ऑफ द इयर, बिझनेस एक्सलन्स अवॉर्ड, बेस्ट मीडिया प्रोफेशनल आदी आणि इतरही अनेक पुरस्कारांचा समावेश आहे.

पारुल यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली 'पिक्चर एन क्राफ्ट'ने भारतातील सर्वात प्रतिष्ठित स्वदेशी वैविध्यपूर्ण संप्रेषण गटांपैकी एक वेगळी प्रतिष्ठा मिळवली आहे. कंपनीचे ध्येय म्हणजे ग्राहकांच्या अंतर्दृष्टी, अनुभव, कौशल्य, सर्जनशीलता, पर्यावरणीय ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्याचा वापर करून, नफ्यात शाश्वत वाढ करून सर्वोत्तम संप्रेषण एजन्सी बनणे हे आहे. पारुल चावला यांची उत्कृष्टतेसाठीची वचनबद्धता आणि नवोन्मेषासाठी सतत प्रयत्नशील राहिल्याच्या ध्येयाने उद्योगात नवीन मानके निर्माण झाली आहेत. 'पिक्चर एन क्राफ्ट' ची सगळी टीम त्यांच्या नेतृत्वाखाली काम करते. ती मीडिया आणि पीआरच्या भविष्याला आकार देणारी नवीन क्रांतिकारी साधने, प्रक्रिया आणि प्रणाली विकसित करत असते. पारुल चावला म्हणतात, 'आम्ही जनसंपर्क आणि मार्केटिंग क्षेत्रात नवोन्मेष आणण्याचा आणि सीमा ओलांडण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळेच अलिकडे मिळालेला पुरस्कार आम्हाला  क्लायंटसाठी उत्कृष्टता प्रदान करत राहण्यास प्रेरित करणारा आहे.' थोडक्यात चित्रपट, संगीत, डिजिटल मीडिया, सोशल मीडिया, जाहिरात आणि मार्केटिंगमध्ये 'पिक्चर एन क्राफ्ट' ही कंपनी आघाडीची शक्ती म्हणून उभे आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.  हा संपूर्ण उद्योग पारुल यांच्या दूरदर्शी नेतृत्वाच्या बळकट खांबावर असाच वाढणार आहे.




# तेजस्वी त्वचेसाठी...

सूर्यप्रकाश, प्रदूषण आणि ताणतणाव यामुळे चेहरा निस्तेज दिसू लागतो. उन्हाळ्यात तर हा त्रास तीव्रतेने जाणवतो. पण आपल्याला नेहमी पार्लरमध्ये जाऊन फेशियल करण्यासाठी वेळ मिळत नाही, तसेच प्रत्येक वेळी केमिकलयुक्त उत्पादने वापरणेही योग्य नसते. अशावेळी घरी नैसर्गिक घटकांपासून बनवलेला फेस पॅक लावून आपण त्वचेला त्वरित चमक देऊ शकतो. यातील रसायनमुक्त, प्रभावी आणि पूर्णपणे नैसर्गिक तत्वे त्वचेची खोलवर स्वच्छता करतात आणि ती निरोगी आणि चमकदार बनवतात.

* काकडी आणि कोरफडीचा फेस पॅक: तुमची त्वचा कोरडी आणि निर्जीव झाली असेल तर हा पॅक वापरल्याने तिला त्वरित हायड्रेशन मिळेल. त्यासाठी दोन चमचे काकडीचा रस, एक टीस्पून कोरफड जेल आणि एक चमचा मध ही सामग्री घ्या. सर्व घटक चांगले मिसळून चेहऱ्यावर लावा. १५-२० मिनिटांनी थंड पाण्याने धुवा. हा नैसर्गिक पॅक त्वचेला थंडावा देतो. याने त्वचेचा कोरडेपणा दूर होतो तसेच तो त्वचेला खोलवर मॉइश्चरायझही करतो.

* पुदिना आणि मुलतानी मातीचा फेस पॅक: तुमची त्वचा खूप तेलकट झाली असेल तसेच मुरुमे दिसू लागली असतील तर हा फेस पॅक त्यावर नियंत्रण ठेवेल. यासाठी एक टीस्पून पुदिन्याची पेस्ट, एक टीस्पून मुलतानी माती आणि एक चमचा गुलाबजल घ्या. हे सर्व पदार्थ एकत्र मिसळून चेहऱ्यावर लावा. १५ मिनिटांनी कोमट पाण्याने चेहरा धुवा. हा पॅक त्वचेवरील अतिरिक्त तेल काढून टाकतो तसेच नियमित लावल्यास मुरुमे आणि डागही कमी होतात.

* ग्रीन टी आणि दह्याचा फेस पॅक: त्वचा निस्तेज आणि निर्जीव दिसत असेल तर हा फेस पॅक तुम्हाला त्वरित चमक देईल. त्यासाठी एक टीस्पून ग्रीन टी, एक टीस्पून दही आणि एक टीस्पून मध घेऊन एकत्र मिसळा आणि चेहऱ्यावर लावा. २० मिनिटांनंतर हलक्या हाताने मसाज करा आणि चेहरा धुवा. नियमित वापर केल्यास या लेपामुळे त्वचा घातक द्रव्यांपासून मुक्त होते तसेच सुरकुत्याही कमी होतात.



# मेकअप करताना...

बऱ्याचदा मेकअप केल्यानंतर चेहरा डार्क दिसतो. काळपट छटा डोकावते. यामागे आपल्या काही चुका कारणीभूत असतात. जसे की, मेकअप करताना चेहऱ्याचा रंग आणि मेकअप उत्पादनांमध्ये योग्य टोन न निवडल्यास ही समस्या संभवते. कधीकधी चुकीचे फाउंडेशन किंवा कन्सीलर वापरल्यानेही चेहरा काळवंडू शकतो. म्हणूनच नेहमी त्वचेच्या रंगानुसार उत्पादने निवडा आणि ती योग्यरित्या मिसळून नंतरच त्वचेवर लावा. चेहऱ्यावर काळे डाग असतील तर नारंगी किंवा पीच रंगाच्या कन्सीलरचा वापर करा. यामुळे तुमची त्वचा निर्दोष दिसण्यास मदत करेल.



# अतिरेक नको

अनेक कारणांसाठी ॲलोवेरा जेलचा वापर होताना दिसतो. त्याचे बरेच फायदे मिळतात. मात्र अतिरिक्त प्रमाणात कोरफडीच्या जेलचा वापर त्वचेसाठी हानिकारक देखील ठरु शकतो. जास्त वापर केला तर त्वचेसंबंधी अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. उदाहरणार्थ, एलोवेरा जेल जास्त प्रमाणात वापरत असाल तर त्वचेवर खाज आणि जळजळ होऊ शकते. तसेच काहींना  ऍलर्जीचा त्रासही संभवतो. अर्थातच यामुळे त्यांना अधिक समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. म्हणूनच कोरफडीचा गर वा जेल प्रमाणात वापरा.





# आकर्षक लूकसाठी...

तुम्हाला नैसर्गिक आणि ताजा ब्लश लूक हवा असेल तर लिपस्टिक वापरा. गालावर गडद गुलाबी किंवा न्यूड शेडची लिपस्टिक लावा आणि बोटांनी किंवा मेकअप स्पंजने चांगली मिसळा. हा लूक तुम्हाला  चमकदार आणि तरुण लूक देईल.

तुम्ही लिपस्टिक आयशॅडो म्हणूनही वापरता येते. त्यासाठी आवडता लिपस्टिक रंग घ्या आणि डोळ्यांच्या वरच्या भागावर लावा. नंतर तो बोटांनी चांगला पसरवा. यामुळे डोळ्यांना नवीन आणि ग्लॅमरस लूक मिळेल.

# तुम्ही कार्यक्षम आहात?

कामाच्या ठिकाणी आपली उत्पादकता वाढणं गरजेचं असतं. उत्पादकता वाढवणं, कार्यक्षम असणं याबाबत आपले काही गैरसमज असतात. ऑफिसमध्ये जास्त वेळ बसलो, कामाचा खूप ताण घेतला की उत्पादकता वाढते असं अनेकांना वाटतं. भरपूर काम केल्याचं समाधान चेहऱ्यावर दिसू लागतं. पण यामुळे तुमची उत्पादकता खरंच वाढते का, आपण अधिक कार्यक्षम होतो का, जाणून घेऊ.

* दोन तासांच्या कामासाठी आठ तास घालवल्यामुळे तुम्ही खूप व्यस्त असल्याचं दिसत असलं तरी प्रत्यक्षात तुम्ही कार्यक्षम नसता. दोन तासांच्या कामासाठी आठ तास घालवण्यात काहीच अर्थ नसतो. अपुरी झोप आणि कामाच्या ज्यादा तासांमुळे तुमच्या आरोग्यावर परिणाम होतो. पण तुम्ही कार्यक्षम बनू शकत नाही.

* कमीत कमी वेळात शक्य तेवढं काम उरकल्याने तुम्ही कार्यक्षम ठरत नाही. ऑफिसमध्ये तुम्ही कामाचे प्राधान्यक्रम ठरवायला हवेत. महत्त्वाची कामं आधी करायला हवीत. नको ती कामं करून वेळ घालवत बसण्याला काहीच अर्थ नसतो. एका वेळी एक काम करण्यावर भर द्या.

* कार्यक्षमता वाढवण्यासाठी कर्मचाऱ्यांसोबत मिटिंग घेणं किंवा चर्चा झडणं महत्त्वाचं असतं असं अनेकांना वाटतं. पण यामुळे कामाचा ताण वाढू शकतो. कर्मचाऱ्यांसोबतची झटपट मिटिंग कार्यक्षमता वाढवू शकते. पण या मिटिंग्जचा कालावधी वाढणं कामाच्या दृष्टीने योग्य नसतं.

* ठरलेल्या वेळेत दर्जेदार काम करणं हे कार्यक्षम असण्याचं लक्षण असतं. पण एखादं काम बराच वेळ करत रहाण्याला काहीच अर्थ नसतो. कामाला जास्त वेळ लागणं हे कार्यक्षमतेचं लक्षण ठरू शकत नाही.

* आपलं काम ठरलेल्या वेळेत पूर्ण करणं किंवा कमी कालावधीत जास्तीत जास्त काम करणं म्हणजे कार्यक्षम असणं नव्हे. तर आपलं काम झाल्यानंतर आनंदी असणं, कुटुंब, आप्त, मित्रमैत्रिणींसोबत वेळ घालवायला मिळणं, छंद जोपासणं हे कार्यक्षमतेचं खरं लक्षण आहे.

## धनंजय मुंडेंच्या खात्याचा पदभार
# उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :**
मस्सोजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडामुळे अडचणी आलेल्या धनंजय मुंडेंना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. यामुळे त्यांच्या जागी आता कोणाला संधी मिळणार? अशा चर्चा सुरू झाल्या असतानाच मुंडेंच्या खात्याचा कारभार अजित पवारांनी आपल्याकडे घेतला आहे. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण खात्याचा कारभार आपल्याकडे घेतला आहे.

संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो समोर आल्यानंतर एकच संतापाची लाट उसळली. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यांच्याकडे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण हे खाते होते. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यानंतर त्यांच्याकडील खात्याचा पदभार कोणाकडे जाणार असा प्रश्न उपस्थित झाला होता.

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर हा विभाग रिक्त होता. मात्र, अर्थसंकल्पीय अधिवेशनात या खात्याशी संबंधित प्रश्न सभागृहात विचारले जाऊ शकतात. त्यामुळे अजित पवार यांनी तूर्तास या खात्याचा कार्यभार स्वतःकडे घेतला. अर्थसंकल्पीय अधिवेशनात या विभागासंबंधीच्या प्रश्नांना आता ते उत्तर देतील. मात्र, अजित पवार हा अतिरिक्त कार्यभार कधीपर्यंत सांभाळणार आणि हे खाते राष्ट्रवादीतील कोणत्या मंत्र्याच्या पदरात टाकणार,याविषयी अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये हालचालींना वेग आला आहे. धनंजय मुंडेंच्या जागी आता छगन भुजबळांची सरकारमध्ये एन्ट्री होणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे. दुसरीकडे धनंजय मुंडेंच्या जागी बीडमधील आमदारालाच मंत्रिपद देण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे. प्रकाश सोळंके आणि विजयसिंह पंडित यांच्या नावाची चर्चा सुरू असल्याचे बोलले जात आहे.

# सौहार्दवृद्धीसाठी बेल्जियमशी सामंजस्य करार

## बेल्जियमच्या प्रिन्सेस ॲस्ट्रिड आणि मुख्यमंत्री फडणवीस यांची उपस्थिती



**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ६ :**
शिक्षण, आरोग्य, वैद्यकीय,तंत्रज्ञान, अक्षय ऊर्जा व संशोधन तंत्रज्ञान आदी विविध क्षेत्रातील सौहार्दवृद्धीसाठी बेल्जियमशी सामंजस्य करार करण्यात आले. हॉटेल ताजमध्ये बेल्जियमच्या प्रिन्सेस ॲस्ट्रिड यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत सांमजस्य करार करण्यात आले.

यावेळी बेल्जियमच्या प्रिन्सेस ॲस्ट्रिड यांच्या नेतृत्वाखालील बेल्जियमचे आर्थिक शिष्टमंडळ, बेल्जियमचे भारतातील राजदूत, अपर मुख्य सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा म्हैसकर, उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अन्बलगन, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे आदी उपस्थित होते. देशातील नामवंत कंपन्यांचे मुख्य कार्यकारी आधिकारी आणि भारतीय प्रौद्योगिकी संस्थेचे प्रतिनिधी यांनी सामंजस्य करारवर स्वाक्षरी केल्या.

बेल्जियमचे आर्थिक शिष्टमंडळ भारताच्या दौऱ्यावर असून शिक्षण, आरोग्य, वैद्यकीय, तंत्रज्ञान, अक्षय ऊर्जा व संशोधन आदी क्षेत्रातील सौहार्दवृद्धीसाठी १२ सामंजस्य करार करण्यात आले. या सामंजस्य करारामुळे बेल्जियमशी मैत्रीपूर्ण संबंध आणखी मजबूत होतील अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# केम छो भाई तमे, सारू छो ना?

## गुजरातीतून संवाद साधत आव्हाडांचा टोला



**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ६ :**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते भैय्याजी जोशी यांनी मुंबईची भाषा ही मराठी नसल्याचे वक्तव्य केले होते. त्यांच्या वक्तव्यानंतर विरोधकांकडून अधिवेशनात सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले जात आहे.

भैय्याजी जोशींच्या वक्तव्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी गुजराती भाषेमधून संवाद साधला. आव्हाड यांनी विधानभवन परिसरात भाजप नेते प्रविण दरेकरांशी गुजरातीमध्ये बोलता त्यांना टोला लगावला आहे. दरेकर भाई केम छो तमे, सारू छो ना? असा सवाल विचारत आव्हाड यांनी दरेकरांना डिवचले. यानंतर त्यांनी माध्यमांशी बोलताना देखील गुजराती भाषेतून सुरुवात केली.

जितेंद्र आव्हाड यांनी माध्यमांशी बोलताना केम छो भाई, सारो छे ना असे म्हणत सुरुवात केली. यावरून पत्रकारांनी त्यांना विचारले असता, आता मराठी नाही बोलायचे, असे आव्हाड म्हणाले. आता मराठी नाही, तर केम छो, ढोकला, फाफडा, जलेबी आता आपल्याला मराठी बटाटा वडा, वडापाव नाही बोलायचे. आता मुंबईत राहायचे असेल, तर गुजराती बोलायचे. आपल्या पोरांना गुजराती शाळेत घाला. कारण गुजराती ही आता घाटकोपरची भाषा झाली. ती कालांतराने मुलुंटची भाषा होईल. त्यानंतर दहिसर आणि अंधेरीची भाषा होईल. मराठी फक्त दादरची भाषा मराठी राहील. म्हणजे आपण फक्त दादरपुरते मयार्दीत राहणार. मराठी माणसांना जागे केल्याबद्दल थँक्यू भैय्याजी जोशी, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले.

## एसपी कार्यालयातील डीबी ऑफिसला आग

**■ महासागर प्रतिनिधी भंडारा, दि. ६ :**
भंडारा पोलिस अधीक्षक ऑफिसच्या मागिल भागात असलेल्या उक्त ऑफिसला बुधवारी रात्रीच्या सुमारास अचानक आग लागल्याने संपुर्ण साहित्य जळून खाक झाले आहे.

पोलिस अधीक्षक यांच्या चेंबरच्या अगदी लागुन असलेल्या परिसरात डीबी ऑफिस आहे. सुट्टी झाल्यावर ऑफिसमधील कर्मचारी घरी गेले. रात्री काही पोलिस कर्मचाऱ्यांना ऑफिस मधून धूर निघत असल्याचे दिसून आले. जवळ जावून पाहिल्यावर आत मध्ये आग लागली होती.

लगेच अग्नी शमन विभागाची गाडी बोलावण्यात आली व आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. तो पर्यंत डीबी ऑफिस मधील कागदपत्रे, कॉम्प्युटर संच जळले होते. यात जीवित हानी झाली नाही.

## अंतिम अहवालानंतर दोषींवर कारवाई

सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरण

गृहराज्यमंत्री डॉ. भोयर यांची सभागृहात ग्वाही



**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ६ :**
परभणी येथील घटनेत अटक करण्यात आलेल्या आंदोलकांपैकी सोमनाथ सूर्यवंशी यांचा 15 डिसेंबर 2024 रोजी न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला.

वैद्यकीय पथकाच्या अंतिम निष्कषानंतर यासाठी दोषी असलेल्यांवर निश्चित कारवाई करण्यात येईल, असे गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत सांगितले.

सूर्यवंशी यांच्या कुटुंबाच्या निवेदनानुसार त्यांच्या मुलाला नोकरी देण्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.
परभणीच्या घटनेमध्ये सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूसाठी जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत सदस्य भाई जगताप यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य अमोल मिटकरी, डॉ. प्रज्ञा सातव यांनी सहभाग घेतला.

गृहराज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले, परभणी येथे प्रक्षुब्ध जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला. या घटनेत एकूण 11 गुन्हे दाखल करण्यात आले असून 43 जणांना अटक करण्यात आली.

या घटनेत अटक करण्यात आलेल्या आंदोलकांपैकी सोमनाथ सूर्यवंशी यांचा 15 डिसेंबर 2024 रोजी न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. त्यांच्या मृतदेहाचे 16 डिसेंबर 2024 रोजी शवविच्छेदन करण्यात आले. या अहवालात हिस्टोपॅथॉलॉजी परीक्षण अहवालानंतर मृत्यूचे अंतिम कारण निश्चित करुन अंतिम अहवाल देणार असल्याचे नमूद करण्यात आले असून हा अहवाल आल्यानंतर दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे डॉ.भोयर यांनी सांगितले.
या प्रकरणाची सीआयडी मार्फत तसेच न्यायालयीन चौकशी निवृत्त न्यायाधीशांच्या एक सदस्यीय समितीमार्फत सुरू असल्याची माहिती राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी यावेळी दिली.

## शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयांमध्ये
# ३ हजार पशुवैद्यकांची पदे भरणार

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :**
राष्ट्रीय कृषी आयोगाच्या शिफारशींनुसार ५ हजार प्राण्यांमागे एक पशूवैद्यक असणे आवश्यक असून सध्या राज्यात ३ कोटी ३० लाख पशुधन असून, या सेवांसाठी पुरेसे पशूवैद्यकीय कर्मचारी उपलब्ध नाही. या पार्श्वभूमीवर पशूवैद्यकीय शिक्षण आणि पशुसंवर्धन सेवांच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला असून लवकरच ३ हजार पशूवैद्यकांची पदे भरण्यात येत असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विधान परिषदेच्या लक्षवेधी उत्तरामध्ये दिली.

सध्या अकोला, सांगली, बारामती आणि परभणी येथे नवीन पशूवैद्यकीय महाविद्यालये मंजूर करण्यात आली आहेत. शासकीय पशूवैद्यकीय महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची शुल्कवाढ होणार नाही. तसेच, खासगी पशूवैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही शुल्क नियमन प्राधिकरणामार्फत शुल्क निश्चित केले जाणार आहे. शासनाने खासगी महाविद्यालयांना परवानगी देताना कठोर निकष ठेवले असल्याचेही पशुसंवर्धन मंत्री मुंडे म्हणाल्या.

पशूवैद्यकीय सेवा मजबुतीकरणासाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले असून शासनाने श्रेणी-१ पशू रुग्णालयांमध्ये पदवीधारक पशूवैद्यक असणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे राज्यात ३ हजारहून अधिक पशूवैद्यकांची आवश्यकता भासेल. पशूवैद्यकीय परिषद अधिनियमाच्या अंतर्गत हा निर्णय घेण्यात आला असून, त्यामुळे पशुधनासाठी अधिक चांगल्या वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार असल्याचे मुंडे यांनी यावेळी सांगितले.

# सत्ताधारी आमदाराच्या पत्रातून वसुलीची पोलखोल

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :**
रेती, मॅगनीज व गौण खनिजाचे अवैध उत्खनन आणि वाहतुक ही निम्न दर्जाच्या कर्मचाऱ्यांपासून वरिष्ठ अधिकारी आणि थेट मंत्र्यांपर्यंत चरण्याचे कुरण झाल्याचा खळबळजनक दावा सत्ताधारी महायुतीमधीलच एका आमदाराने केला आहे. भंडारा जिल्ह्याच्या तुमसर मोहाडी विधानसभा क्षेत्राचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार राजू कारेमोरे यांनी मोहाडी तहसिलदारांना पाठवलेल्या पत्रातून तरी तसाच वास येतो.

महाविकास आघाडीमधील शरद पवार राष्ट्रवादी गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आमदाराचे हे पत्रच सभागृहात वाचून दाखवत सरकारचे पितळ उघडे पाडले. आमदार कारेमोरे यांनी तहसीलदार मोहाडी यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, मोहाडी तालुक्यातील बेटाळा, निलज, कान्हळगाव, मुंढरी, मोहगाव देवी, पांजरा, रोहा या काही घाटावर रेती डेपो आहेत व काही घाटावर डेपो नाहीत. ज्या कोणी ठेकेदारांनी सदर डेपो किंवा घाट घेतलेले आहेत, ते फक्त नाममात्र आहेत. सदर संपूर्ण घाट व डेपो वैद्य पध्दतीने किंवा नियमानुसार न चालवता अवैध पध्दतीने व नियम धाब्यावर बसवून चालवत आहेत.
हे संपूर्ण घाट खनीज अधिकारी, कर्मचारी, आपण व आपले चेले-चपाटे चालवित आहेत. जनसामान्यात अशी सुध्दा चर्चा आहे की, घाट चालवतांनी कोतवालापासुन ते जिल्हाधिकारी, महसुल मंत्री व खनिकर्म मंत्री यांच्यापर्यंत तसेच पोलीस शिपाई पासुन ते पोलीस अधिक्षक, गृहमंत्री व मुख्यमंत्र्यापर्यंत सर्वांना देणे-घेणे करण्यात येते.
काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांना हाताशी घेवून मोठ्या प्रमाणात हे काळे काम चालत आहेत. जीआरची मागणी करूनही माहिती दिली नाही. तुमसर मोहाडी विधानसभा क्षेत्र किंवा संपूर्ण भंडारा जिल्हयाला बिहार बनवायचे नसेल तर गैरप्रकार थांबवावे,अशी मागणीही त्यांनी या पत्रातून केली आहे. सभागृहातच आमदाराच्या पत्राचे वाचन झाल्याने सरकार आता कुणाकुणावर कारवाई करणार? याकडे लक्ष लागले आहे.

: सिनेरंग :

## एक अविश्वसनीय आणि असाधारण प्रेमकथेचा प्रवास




### माझी प्रारतना

माझी प्रारतना - अकल्पनीय प्रेमकथा, लेखक व दिग्दर्शक पद्मराज राजगोपाल नायर यांचा हा नवा मराठी चित्रपट, प्रेमाच्या कच्च्या आणि तीव्र भावनांना समोर आणणारा आहे, जो तुमच्या हृदयाला हादरवून टाकेल.

ब्रिटिश काळात महाराष्ट्रातील ग्रामीण भागात घडणारी ही संगीतप्रधान कथा आहे, जी प्रेम, विश्वासघात आणि जगण्याच्या जिद्दीचा अद्भुत प्रवास मांडते. ही प्रेमकथा इतकी ताकदीची आणि हृदयस्पर्शी आहे की, वादळासारखी तुमच्यावर आदळेल, तुम्हाला स्तब्ध आणि भारावून टाकेल. जीवनात कितीही दुःख असली तरी प्रेम अंतिम सत्य असते, आणि हा मन हेलावून टाकणारा प्रवास तुम्हाला दाखवेल की प्रेम हीच सर्वकाही जिंकण्याची खरी ताकद आहे.
माझी प्रारतना - अकल्पनीय प्रेमकथा ९ मे २०२५ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात पद्मराज राजगोपाल नायर आणि अनुषा अडेप मुख्य भूमिका साकारत आहेत, तसेच मराठीतील अनेक दिग्गज कलाकार देखील यात झळकणार आहेत. ०

प्रेमाची व्याख्या प्रत्येकासाठी वेगळी असते. प्रेम कोणत्याही सीमा मानत नाही–वय, जात, रूप, किंवा स्वरूप याला प्रेमाची अडचण नसते. दोन हृदयांमधील सुंदर बंधन म्हणजे प्रेम, आणि लवकरच एक अशक्यप्राय प्रेमकथा चित्रपट रसिकांना अनुभवायला मिळणार आहे.

लोकरंजन

: टेलीरंग :

### खंड आणि संस्कृतींच्या पलीकडे

या मार्चमध्ये सोनी बीबीसी अर्थ सादर करत आहे, महिला दिन विशेष. या दिवसाच्या निमित्ताने प्रेक्षकांसाठी प्रेरणादायक पर्यटन आणि अन्वेषणासंबंधी कंटेंट सादर होईल. प्रेक्षक साहस सफरीवर निघतील आणि महिला सादरकर्त्या सू पर्किन्स आणि जोआना लुमली त्यांना दिशादर्शन करून वेगवेगळ्या प्रांतांत आणि संस्कृतींत घेऊन जातील. पर्किन्स गंगा नदीतून सफर करेल, जपानच्या संस्कृती आणि आधुनिकतेच्या मिश्रणाचा शोध घेईल आणि खतरनाक भूप्रदेशातून धाडसी प्रवास करेल. लुमली सिल्क रोडचा माग काढेल, युरोपियन शहरांच्या छुप्या पैलूंचा शोध घेईल आणि लोकप्रिय मसाल्यांचे मूळ शोधत जाईल.
जोआना लुमलीज सिल्क रोड या विविध खंड आणि संस्कृतींच्या व्यापक अन्वेषणासह महिला दिन विशेष सुरू होईल. व्हेनिसपासून सुरू झालेला लुमलीचा प्रवास पूर्वेकडे वळेल आणि प्रेक्षकांना कॅपाडोसियाचे नाट्यमय लँडस्केप, उझबेकिस्तानची शिल्प-आश्चर्ये आणि शांत किर्गीझस्तान अनुभवण्याची संधी देईल. द गॅंजेस विथ सू पर्किन्समध्ये पर्किन्स हिमालयातील पवित्र उगमापासून ते पुढील विस्तीर्ण पात्रापर्यंत वाहणाऱ्या गंगा नदीचा शोध घेत आधुनिक भारताचे दर्शन घडवेल. ती साधू, हवामानामुळे निर्वासित झालेले लोक, यात्रेकरू वगैरे लोकांची भेट घेईल, ज्यांच्यामुळे गंगेला ओळख मिळाली आहे आणि त्यातून ती या नदीची लक्षणीयता उलगडण्याचा प्रयत्न करेल. जोआना लुमलीज ग्रेट सिटीज ऑफ द वर्ल्ड मध्ये युरोपच्या मुख्य शहरांतील गुप्त रहस्ये उघड होतील.
लुमली पॅरिस, रोम आणि बर्लिन या शहरांमध्ये मुशाफिरी करेल, तेथील स्थानिक लोकांना भेटेल. जपान विथ सू पर्किन्समध्ये जपानच्या प्राचीन परंपरा आणि अत्याधुनिक टेक्नॉलॉजी यांच्या मिश्रणातून आणि टोकियोच्या निऑन स्ट्रीट्सपासून ते दूरस्थ गावांमधून या देशाने भूतकाळ आणि भविष्यकाळ यांच्यात कसे संतुलन साधले आहे, हे बघायला मिळेल.
साहसाची आवड असणाऱ्यांसाठी वर्ल्ड्स मोस्ट डेंजरस रोड्सह्ममध्ये सू पर्किन्स अलास्काच्या बर्फाळ डाल्टन हायवे पासून ऐतिहासिकदृष्ट्या भयावह अशा हो ची मिन्ह ट्रेल पर्यंत अत्यंत अवघड आव्हाने स्वीकारताना दिसेल. हा प्रवास जोआना लुमलीज स्पाईस ट्रेल ॲडव्हेंचर सह समाप्त होईल.



० ० ०

अंकुश चौधरी दिग्दर्शित पुन्हा एकदा साडे माडे तीन या बहुचर्चित चित्रपटाचे चित्रीकरण नुकतेच यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. त्यामुळे आता कुरळे ब्रदर्सची धमाल पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर लवकरच पाहायला मिळणार आहे.

अशोक सराफ, मकरंद अनासपुरे, भरत जाधव यांच्या जोडीला सिद्धार्थ जाधव, रिंकू राजगुरू, संकेत पाठक आणि संजय नार्वेकर यांच्याही प्रमुख भूमिका यात आहेत. चित्रपटाच्या यशस्वी समारोपानंतर कलाकार आणि निर्मात्यांनी या चित्रपटाविषयीचा आपला उत्साह व्यक्त केला.

चित्रपटाचे छायाचित्रण प्रसिद्ध छायाचित्रकार संजय जाधव यांनी केले असून, हा सिनेमा प्रेक्षकांसाठी एक मोठी भेट ठरणार आहे. विशेष म्हणजे लोकशाही समूह अंतर्गत असलेले ईओडी मीडिया कंपनीचे संचालक पुष्कर यावलकर यांनी एव्हीकेसोबत हातमिळवणी करत मराठी चित्रपट निर्मितीक्षेत्रात आपले पहिले पाऊल ठेवले आहे. वयाच्या २५ व्या वर्षी निर्माता म्हणून पुन्हा एकदा साडे मेड तीन मध्ये महत्त्वाची भूमिका त्यांनी निभावली आहे.

**अंकुश चौधरी दिग्दर्शित पुन्हा एकदा साडे माडे तीन**



अमेय विनोद खोपकर पिक्चर्स (एव्हीके), उदाहरणार्थ निर्मित, प्रस्तुत या चित्रपटाचे सुधीर कोलते, स्वाती खोपकर, निनाद नंदकुमार बत्तीन निर्माते आहेत.

० ० ०

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## सामाजिक सौहार्दासाठी काँग्रेसची सद्भावना पदयात्रा

**■ महासागर प्रतिनिधी,मुंबई, दि. ६ :**
महाराष्ट्रातील सामाजिक सलोखा आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्यासाठी काँग्रेस पक्षाने सद्भावना पदयात्रेचे आयोजन केले आहे.

ही यात्रा ८ मार्च रोजी बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथून सुरू होणार असून, ९ मार्च रोजी बीड शहरातील सद्भावना मेळाव्यात तिचा समारोप होईल. या यात्रेत सामाजिक कार्यकर्ते, संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिक सहभागी होणार आहेत. यात्रेच्या पूर्वसंध्येला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे सामाजिक एकोपा आणि शांततेसाठी संतांच्या समाधीस्थळी प्रार्थना करणार आहेत. ते ७ मार्च रोजी हिवरे बाजार येथे पोपटराव पवार यांची भेट घेणार, तसेच मढी, भगवानगड आणि नारायणगड येथे जाऊन संत कानिफनाथ, संत भगवानबाबा आणि भगवान नगदनारायण यांच्या समाधीचे दर्शन घेणार आहेत.

८ मार्च रोजी मस्साजोग येथून हर्षवर्धन सपकाळ यात्रा सुरू करतील. स्व. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन या यात्रेला प्रारंभ होईल. दोन दिवसांच्या या यात्रेनंतर ९ मार्च रोजी बीडमध्ये सद्भावना मेळावा होणार आहे.

माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील, विजय वडेट्टीवार, सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ. विश्वजीत कदम,खा. रजनीताई पाटील, डॉ. कल्याण काळे, मोहन जोशी, अतुल लोंढे यांच्यासह पक्षाचे अनेक नेते या सद्भावना पदयात्रेत सहभागी होणार असल्याची माहिती पक्षाने दिली आहे.

## जयंत पाटील यांचा सरकारवर हल्लाबोल

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ६ :**
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली.

राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण प्रचंड वाढले असून, हत्या आणि हल्ल्यांचे प्रमाण चिंताजनक आहे. हे धाडस गुन्हेगारांना कुठून मिळते? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच, सरकारने सत्तेवर येण्यासाठी लोकांना दिलेल्या आश्वासनांचा आणि प्रलोभनांचा राज्यपालांच्या भाषणात उल्लेखही नव्हता, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जयंत पाटील यांनी सरकारच्या दावोस दौऱ्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना सांगितले की, प्रत्येक वेळी मोठ्या गुंतवणुकीचे आणि रोजगार निर्मितीचे दावे केले जातात, पण प्रत्यक्षात त्याचा फायदा किती झाला? गेल्या तीन वर्षांत महाराष्ट्रात ५० लाख तरुणांना रोजगार मिळणे अपेक्षित होते, मात्र बेरोजगारी आणखीच वाढली आहे. याचा हिशेब सरकारने द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

राज्यात उद्योगांना प्रोत्साहन मिळण्याऐवजी स्थानिक गुंडांकडून उद्योजकांना संरक्षण द्यावे लागत आहे. गुंडगिरीचे प्रमाण वाढले असून, छोट्या दुकानदारांपासून मोठ्या उद्योगांपर्यंत खंडणी द्यावी लागते. यामुळे गुंतवणूकदार महाराष्ट्र सोडून बाहेर जात आहेत, असे आरोप त्यांनी केले.

# मार्कडेंश्वर देवस्थानाला उत्खननाचा धोका?



**ब्लॉस्टिंगमुळे पोहचतात हादरा**
देशातील नद्या, ऐतिहासिक मंदिरे, पर्वत, डोंगर, पहाड, हे सर्व राष्ट्रीय संपत्ती असून त्यांच्यावर प्रशासकीय नियंत्रण जलसंपदा विभाग, पर्यावरण विभाग, भूसंशोधन विभाग, पुरातत्त्व विभाग व महसूल विभागाचे असते. त्यामुळे संवेदनशील डोंगरीच्या क्षेत्रातून दगड, गिट्टी, माती, मुरुमाचे उत्खननास व मजबूत दगड फोडण्यास ब्लॉस्टिग करून ईमारतीच्या बांधकामास प्रशाकीयदृष्ट्या मंजुरी मिळत नाही. असे असतानाही रेगडी दिना डॅम नहराच्या बांधकामाकरिता संबंधित विभागाने 1973-1974 वर्षात मोठ्या प्रमाणात डोंगरीवर ब्लास्टिंग करून उत्खनन केलेले दगड-गिट्टी नहराच्या बांधकामास नेले आहे.

**■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ६ :**
विदभार्ची काशी म्हणून ओळख असलेल्या मार्कडेश्वर देवस्थान नजीकच्या डोंगराच्या उत्खननामुळे तसेच वैनगंगा नदीत सोडल्या जाणाऱ्या चिचडोह प्रकल्पाच्या पाण्याच्या तीव्र प्रवाहामुळे वैनगंगेच्या उत्तरवाहिनी वळणावरील डोंगरीवर मारा बसत आहे. यामुळे भविष्यात देवस्थानास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. डोंगरीखाली सिमेंट काँक्रिटची मजबूतभिंत बांधून कायम स्वरुपी उपाययोजना करावी, अशी मागणी सेवानिवृत्त बीडीओ काशिनाथ भडके यांनी केली आहे.

भडके यांनी म्हटले आहे की, वैनगंगा नदीस येत असलेल्या पुरामुळे मार्कंडादेव वरच्या बाजूस नव्यानेच बांधलेल्या चिचडोह बॅरेजमध्ये प्रंचड प्रमाणात जलसाठा गोळा होऊन वैनगंगा नदीची पाणी पातळी वाढल्याने संरक्षणाच्या दृष्टीने सिंचन विभाग चिचडोह प्रकल्पाचे ३८ दरवाजे उघडे करून बॅरेजच्या तीव्र पाण्याचा वेगवान विसर्ग नदीत सोडल्या जात आहे. हा तीव्र पाण्याचा मारा मार्कंडादेव उत्तर वाहिनी वळणावरील डोंगरीवर पडत आहे. तसेच विद्युत विभागाने संवेदनशील डोंगरीवरच पॉवर हाऊसचे बांधकाम केले आहे. अती उत्खनने, ईमारतीचे बांधकाम व तीव्र प्रवाहामुळे डोंगरीवर दबाव पडत आहे. त्यामुळे भविष्यात तीर्थस्थळासह परिसराला धोका होऊ शकतो. परिणामी, समितीकडून सर्वेक्षण करून डोंगरीखाली सिमेंट काँक्रिटची मजबूत संरक्षण भिंत बांधून कायमस्वरूपी उपाययोजना करावी, आवश्यक निधी मंजूर करावा, अशी मागणी काशिनाथ भडके, प्रभाकर वासेकर, देवा सोनटक्के, पांडुरंग घोटेकर, सि. पी. शेंडे, रतन शेंडे, लहूकुमार रामटेके, के. डी. मेश्राम आदींनी केली आहे.